cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६६ | शनिवार दि.०५ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय....

### ७.८ टक्क्यांचा जल्लोष की आकड्यांचा आभास?

भारताचा जीडीपी ७.८ टक्क्यांनी वाढला आणि सरकारच्या आर्थिक दालनात जल्लोष सुरू झाला. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताची वाढ सर्वाधिक असल्याचे सांगत सरकारने पुन्हा एकदा 'विकासगाथे'चा ढोल वाजवला. पण या ढोलाचा आवाज जितका मोठा आहे, तितकेच त्यामागचे आकडे आता प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले आहेत. वादाचा केंद्रबिंदू आहे तो मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या जीडीपी आकड्याचा. हा आकडा पूर्वी सुमारे ८६ लाख कोटी रुपये होता. नव्या मालिकेत तो सुमारे ८०.४४ लाख कोटी रुपयांवर आला.

# राज्यात पावसाची ओढ ; तात्काळ दुष्काळ जाहीर करा

## शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्या–आ.रोहित पवार यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील बहुतांश भागांत पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडला असून, अनेक ठिकाणी पिके करपण्यास सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने औपचारिक निकषांची वाट न पाहता तातडीने दुष्काळ जाहीर करावा आणि सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. त्यांनी सरकारसमोर दहा प्रमुख मागण्या मांडल्या आहेत.**

रोहित पवार यांनी पत्रात म्हटले आहे की, कोकणपट्टा, विदर्भातील काही जिल्हे वगळता राज्याच्या बहुतांश भागांत पावसाची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. काही जिल्ह्यांमध्ये गेल्या तीन महिन्यांत सरासरीच्या तुलनेत सुमारे ६० टक्क्यांपर्यंत पावसाची तूट आहे. तालुकानिहाय स्थिती आणखी गंभीर आहे. ◀◀ पान २ वर



### मराठवाडा, विदर्भातील पेरणी क्षेत्रात घट

पावसाच्या लहरीपणाचा थेट परिणाम खरीप पेरणीवरही झाला आहे. विदर्भात ऑगस्ट २०२५ अखेर ५० लाख ४ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. यंदा हे क्षेत्र घटून ४७ लाख ५० हजार हेक्टर झाले आहे. मराठवाड्यात २०२५ मध्ये ४८ लाख २१ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. यंदा हे क्षेत्र ४६ लाख १९ हजार हेक्टरपर्यंत घटले आहे.

### पुढील काळात संकट वाढण्याची भीती

जागतिक हवामान संस्थेच्या माहितीनुसार एल निनोचा प्रभाव अधिक तीव्र होण्याची शक्यता असून, त्याचा परिणाम २०२७ पर्यंत जाणवू शकतो. त्यामुळे शेतीबरोबरच पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. या सर्व बाबींचा विचार करून सरकारने तातडीने दुष्काळी उपाययोजना सुरू करणे आवश्यक असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात...

### गांधींचे आत्मचरित्र हार्परकॉलिन्सकडे

दिल्लीः काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या बिलाँगिंग या आगामी आत्मकथनात्मक पुस्तकाच्या भारतातील प्रकाशनावरून मोठा वाद निर्माण झाला होता. आता या आत्मचरित्राचे प्रकाशन आता हार्परकॉलिन्स इंडिया करणार आहे. पेंग्विन रँडम हाऊस इंडिया आणि सोनिया गांधी यांच्यातील करारात अडसर निर्माण झाल्याच्या वृत्तानंतर एका आठवड्यातच हार्परकॉलिन्स इंडियाने या पुस्तकाच्या प्रकाशनाची अधिकृत घोषणा केली आहे. प्रकाशक कंपनी हार्परकॉलिन्स इंडियाने या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत माहिती दिली की, हे पुस्तक १० नोव्हेंबर २०२६ रोजी भारतात प्रकाशित होईल. पोस्टमध्ये नमूद करण्यात आले आहे की, ''आपल्या काळातील सर्वात बहुप्रतिक्षित राजकीय आत्मचरित्रांपैकी एक असलेले 'बिलाँगिंग' हे प्रेम, ओळख, कर्तव्य आणि आपुलकीची एक नाट्यमय आणि अत्यंत वैयक्तिक कहाणी आहे. हे पुस्तक भारताच्या प्रवासाचा एक दुर्मिळ अंतर्गत दृष्टिकोन मांडते.''

### नेपाळच्या पुरात अडकलेल्या कामगाराची सुटका

काठमांडूः नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी अचानक पुरामुळे एका जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात अनेक कामगार अडकले होते. बचावलेल्यांना शोधण्याच्या आशा मावळू लागल्या असतानाच, शुक्रवारी दोन कामगारांची चमत्कारिकरीत्या सुटका करण्यात आली. मेकॅनिकल इंजिनिअर संजय साह यांच्यासाठी हे एखाद्या पुनर्जन्मासारखेच होते; मृत्यू आणि जीवन यांच्यातील त्या अनिश्चित काळात आपण सतत 'हरे कृष्ण महामंत्रा'चा जप करत होतो, असे त्यांनी सांगितले. त्रिशुली–३ए जलविद्युत प्रकल्पाच्या ठिकाणच्या बोगद्यातून सुटका झालेले दुसरे कामगार कबीर महर्जन हे होते. गेल्या आठवड्यात नेपाळ–तिबेट सीमेवरील काही भागांत आलेल्या अचानक पुरामुळे १,२५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

### दिशा सालियन प्रकरणाशी संबंध नाही–आदित्य ठाकरे

नाशिकः दिशा सालियन मृत्यू प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाला तपासाचे आदेश दिल्यानंतर, शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी यावर आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. माझा या प्रकरणाशी काहीही संबंध नाही आणि मला यावर कोणतीही टिप्पणी करण्याची गरज नाही, असे स्पष्ट मत आदित्य ठाकरे यांनी व्यक्त केले आहे. नाशिक येथे पत्रकारांशी बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, माझा या विषयाशी काहीही संबंध नाही. मी या गोष्टीचा विचारही केलेला नाही, मग मी यावर उत्तर का द्यावे? अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची माजी मॅनेजर असलेल्या दिशा सालियानचा ८ जून २०२० रोजी मुंबईतील मालवणी, मालाड भागातील एका निवासी इमारतीच्या १२ व्या मजल्यावरून पडून मृत्यू झाला होता. या प्रकरणात पोलिसांनी आधी अपघाती मृत्यूची नोंद केली होती.

# प्रचलित पद्धतीनेच संचमान्यता करा

## निकष बदलाच्या विरोधात हजारो शिक्षक रस्त्यावर



पुणे । प्रतिनिधी

कनिष्ठ महाविद्यालयीन ऑनलाइन संचमान्यतेसाठी लागू करण्यात येत असलेले सुधारित निकष नियमबाह्य असून, त्याचा विद्यार्थी आणि शिक्षकांवर विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे सुधारित निकष रद्द करून गेल्या अनेक वर्षांपासून प्रचलित असलेल्या निकषांनुसारच संचमान्यता ◀◀ पान २ वर

# सीईटीच्या विद्यार्थ्यांचा गोपनीय डेटा लीक!

## शैक्षणिक वर्तुळात खळबळ, प्रशासनाकडून पोलिसांना पत्र

मुंबई । प्रतिनिधी

**महाराष्ट्र सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाशी संबंधित तब्बल ४ लाख ५९ हजार ४९३ विद्यार्थ्यांची अत्यंत गोपनीय वैयक्तिक माहिती लीक झाल्याची गंभीर घटना उजेडात आली असून, यामुळे शैक्षणिक वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत सीईटी सेलच्या प्रशासनाने मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्यात अधिकृत पत्र देऊन कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.**




१ सप्टेंबर २०२६ रोजी नारायण शिंगारे यांनी ही डेटा लीक झाल्याची बाब सीईटी सेलच्या निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर तात्काळ पावले उचलत सीईटी सेलच्या संगणकांची व यंत्रणेची फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली. या तांत्रिक तपासात माहिती बाहेर फुटल्याचे स्पष्ट झाल्यानंतर प्रशासकीय पातळीवर हालचाली तीव्र झाल्या. शुक्रवारी, ४ सप्टेंबर २०२६ रोजी आमदार रोहित पवार यांनी सीईटी कक्षाला प्रत्यक्ष भेट देऊन या संपूर्ण प्रकरणाची माहिती घेतली. या गंभीर डेटा लीक प्रकरणी तात्काळ पोलीस तक्रार दाखल करून कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे रोहित पवार यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. आमदार रोहित पवार यांच्या पाठपुराव्यानंतर आणि तक्रारीनुसार, सीईटी सेलचे प्रशासकीय अधिकारी श्रीकांत मडावी ◀◀ पान २ वर

# 'ते शिव्या देताय तरी मंत्री पाय धरायला जातायत'

## भुजबळांचा सरकारला घरचा आहेर

मुंबई । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राज्याचे राजकारण तापले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपोषणाचे हत्यार उपसले असून त्यांच्या उपोषणाचा आज सातवा दिवस आहे. त्यांनी सरकारला ११ तारखेपर्यंत सर्व मागण्या मान्य करण्याचा अल्टिमेटम दिला आहे.**

गुरुवारी (दि. ३) मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, मंत्री उदय सामंत आणि भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या शिष्टमंडळाने जरांगेंची उपोषणस्थळी जाऊन भेट घेतली. मात्र सरकारच्या शिष्टमंडळाला यश आले नाही. त्यामुळे मनोज जरांगे उपोषणावर कायम आहेत. यासर्व पार्श्वभूमीवर आता ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी देखील आक्रमक भूमिका घेतली आहे. छगन भुजबळ म्हणाले की, जात



पडताळणी समिती ही महत्त्वाची समिती आहे. त्याच्यावर कुणीही दबाव आणता कामा नये. मंत्र्यांनी देखील दबाव आणू नये. काही प्रमाणपत्र जातपडताळणी समितीने नाकारली आहे. ती प्रमाणपत्र दुरूस्त करून देतो असं काही आमदार म्हणाले आहेत. त्यांना माझा सवाल आहे की, मुंबईत ४ नगरसेवकांचं जात पडताळणीत प्रमाणपत्र रद्द झालं आहे. त्यामुळे त्यांचं पद गेलं. ते देखील तुम्ही दुरूस्त करून देणार आहात का? असा सवाल भुजबळांनी उपस्थितीत करत नाव न घेता प्रसाद लाड यांना टोला लगावला. मंत्री छगन भुजबळ यांनी कुणबी प्रमाणपत्र घेताना त्यावर खाडाखोडी केल्याचा आरोपही केला आहे. आता असे खाडाखोड केलेले दाखले तुम्ही स्वीकारणार आहात का? असा सवाल भुजबळांनी उपस्थितीत केला. जात पडताळणी समितीवर कुणीही दबाव ◀◀ पान २ वर

# सरकारी शाळांत बाहेरच्या व्यक्तींना आता 'नो एन्ट्री'

## सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका फेटाळली




नवी दिल्ली । वृत्तसंस्था

राजस्थान, उत्तर प्रदेशातील सरकारी शाळांमध्ये पत्रकार, युट्यूबर, समाजमाध्यमांशी संबंधित व्यक्ती तसेच नागरी समाज संघटनांच्या प्रवेशावर घालण्यात आलेल्या निर्बंधांविरोधातील जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे संबंधित राज्यांनी जारी केलेले आदेश सध्या कायम राहणार आहेत. १ सप्टेंबरच्या आदेशात न्यायालयाने, 'भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास आम्ही इच्छुक नाही,' असे नमूद केले.

राजस्थानमध्ये 'शाळा दुरुस्त करा' मोहिमेअंतर्गत सरकारी शाळेची पाहणी करणाऱ्या कार्यकर्त्यांवर अलीकडेच हल्ला झाला होता. या पार्श्वभूमीवर ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहूः १८.५० क्विंटल | | |
| २,५५१ | २,८०० | २,६७५ |
| ज्वारी/हायब्रिडः ८५.०० क्विंटल | | |
| १,५०० | ३,८४५ | २,८३० |
| मका/लोकलः ८.०० क्विंटल | | |
| २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ३३.०० क्विंटल | | |
| ७,३०० | ८,२६० | ८,०६२ |
| उडीद : २३.५० क्विंटल | | |
| ८,२५० | ८,२५० | ८,२५० |
| बाजरीः १८.०० क्विंटल | | |
| २,२१० | २,७९५ | २,६१२ |
| मुगः १०.०० क्विंटल | | |
| ९,२५० | १०,०९२ | ९,४५२ |
| सोयाबीनः १९.५० क्विंटल | | |
| ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभराः ४.०० क्विंटल | | |
| ५,१०० | ६,९०० | ६,००० |

# शिवभोजनसाठी ७२ कोटी निधी मंजूर !

## १० रुपयांत थाळी सुरुच राहणार, सरकारचा महत्त्वाचा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**अनुदानाअभावी काही शिवभोजन थाळी केंद्र बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गरीब व गरजू व्यक्तींना स्वस्त दरात शिवभोजन उपलब्ध करुन देण्यासाठी सरकारने ७२ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जारी केला आहे.**

शिवभोजन थाळी १० रुपयांत मिळते. त्यासाठी सरकारकडून शिवभोजन थाळी चालकांना अनुदान दिले जाते. सदर



योजनेसाठी २०२६–२७ या आर्थिक वर्षात १२० कोटी इतक्या निधीची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी सध्या वित्त विभागाने ७२ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदरचा निधी उपनियंत्रक (शिधावाटप), सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी व सर्व जिल्हा पुरवठा ◀◀ पान २ वर

### बंद पडण्याच्या मार्गावर असलेल्या केंद्रांना दिलासा

अनुदान मिळाले नसल्याने अनेक शिवभोजन थाळी केंद्रे बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. याबाबत याआधी नागपूर विभागातील शिवभोजन थाळी केंद्र चालकांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी मांडल्या होत्या. त्यावर त्यांनी तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते. आता सरकारने हे केंद्र सुरु राहण्यासाठी निधी मंजूर केला आहे. यामुळे तूर्त तरी शिवभोजन थाळी सुरु राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# फुकट राबवून हमाली करून घेण्यात भारत जगात आघाडीवर

## २४ टक्के कर्मचारी आठवड्याला १६ तासांपेक्षा अतिरिक्त काम करतात ; थेट अहवाल आला समोर

नवी दिल्ली । प्रतिनिधी

**भारतातील कामगारांच्या वेतन आणि कामाच्या तासांबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत असतानाच एका ताज्या अहवालातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. जगभरातील कर्मचाऱ्यांमध्ये सर्वाधिक विनावेतन अतिरिक्त तास काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे प्रमाण भारतात असल्याचे एडीपीच्या पीपल ॲट वर्क २०२६ अहवालातून समोर आले आहे.**

एडीपीने २०२५ मध्ये केलेल्या या सर्वेक्षणात ३६ देशांतील ३९ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांचा समावेश करण्यात आला होता. या सर्वेक्षणानुसार भारतातील २४ टक्के कर्मचारी आठवड्याला १६ तास किंवा त्याहून अधिक अतिरिक्त काम करतात; मात्र त्यासाठी त्यांना कोणताही अतिरिक्त मोबदला मिळत नाही. त्यामुळे १६ तास किंवा त्याहून अधिक विनावेतन काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रमाणात भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. अहवालातील आणखी एका आकडेवारीनुसार, भारतातील ४० टक्के कर्मचारी आठवड्याला ◀◀ पान २ वर



### जागतिक चित्रही चिंताजनक

जागतिक पातळीवरही विनावेतन अतिरिक्त कामाचे प्रमाण मोठे आहे. अहवालानुसार, ६२ टक्के कर्मचारी आठवड्याला पाच तास किंवा त्यापेक्षा कमी विनावेतन काम करतात. तर २६ टक्के कर्मचारी ६ ते १५ तास आणि १२ टक्के कर्मचारी १६ तास किंवा त्याहून अधिक विनावेतन काम करतात.

cmyk

## अग्रलेख

# ७.८ टक्क्यांचा जल्लोष की आकड्यांचा आभास?

भारताचा जीडीपी ७.८ टक्क्यांनी वाढला आणि सरकारच्या आर्थिक दालनात जल्लोष सुरू झाला. जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताची वाढ सर्वाधिक असल्याचे सांगत सरकारने पुन्हा एकदा 'विकासगाथे'चा ढोल वाजवला. पण या ढोलाचा आवाज जितका मोठा आहे, तितकेच त्यामागचे आकडे आता प्रश्नांच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

वादाचा केंद्रबिंदू आहे तो मागील वर्षाच्या पहिल्या तिमाहीच्या जीडीपी आकड्याचा. हा आकडा पूर्वी सुमारे ८६ लाख कोटी रुपये होता. नव्या मालिकेत तो सुमारे ८०.४४ लाख कोटी रुपयांवर आला. सरकारच्या मते ही सुधारणा नवीन आधारवर्ष, अधिक अद्ययावत माहिती आणि बदललेल्या सांख्यिकीय पद्धतीमुळे झाली. माजी अर्थसचिव सुभाषचंद्र गर्ग मात्र या सुधारणांवर गंभीर आक्षेप घेत आहेत. म्हणजे प्रश्न एवढाच नाही की ७.८ टक्के बरोबर की चूक? खरा प्रश्न आहे, सरकारच्या आर्थिक आकडेवारीवर सामान्य नागरिकाने विश्वास तरी कसा ठेवायचा? आकडेवारी बदलणे हे अर्थव्यवस्थेच्या मोजमापातील सामान्य तांत्रिक प्रक्रिया असू शकते. पण जेव्हा जुन्या मालिकेतील आकडे मोठ्या प्रमाणावर बदलतात आणि त्याच वेळी चालू वर्षातील वाढीचा आकडा विक्रमी असल्याचे सांगितले जाते, तेव्हा सरकारने केवळ 'पद्धत बदलली' एवढे सांगून भागणार नाही. कोणता आकडा का बदलला, कोणत्या सूत्राने बदलला आणि त्या बदलाचा वाढीच्या दरावर नेमका किती परिणाम झालायाचा साधा, पारदर्शक आणि स्वतंत्रपणे तपासता येईल असा हिशेब देशासमोर ठेवावा लागेल. याच ठिकाणी 'सांख्यिकीय कसरती'चा संशय जन्म घेतो. सरकारच्या आर्थिक सल्लागार परिषदेकडून संजीव संन्याल यांनी नव्या पद्धतीचे समर्थन केले आहे. त्यांच्या मते आधारवर्ष बदलणे ही आवश्यक आणि आंतरराष्ट्रीय पद्धतीशी सुसंगत प्रक्रिया आहे. सरकारनेही मालिकेबाबत सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. पण सरकारला एक प्रश्न विचारावाच लागेल. आकडे योग्य असतील तर त्यांच्याभोवती एवढा संशय निर्माण का झाला? आर्थिक वाढीचा खरा अर्थ केवळ च्या स्क्रीनवर दिसणारा टक्का नाही. त्या वाढीचे प्रतिबिंब रोजगारात दिसले पाहिजे. कुटुंबांच्या उत्पन्नात दिसले पाहिजे. ग्रामीण बाजारपेठेत दिसले पाहिजे. छोट्या दुकानदाराच्या उलाढालीत दिसले पाहिजे. तरुणांच्या हाताला काम मिळण्यात दिसले पाहिजे. इथेच '७.८ टक्के' या चमकदार आकड्याची खरी परीक्षा सुरू होते. सरकारच्या बाजूनेही काही आकडे आहेत. नव्या आकडेवारीनुसार खासगी गुंतवणुकीत वाढीची चिन्हे दिसत आहेत आणि स्थिर भांडवली निर्मितीचा वाटाही वाढला आहे. त्यामुळे संपूर्ण आर्थिक चित्र काळेकुट्ट आहे, असे म्हणणेही तितकेच चुकीचे ठरेल. म्हणूनच सरकारची खरी कसोटी विरोधकांना गप्प करण्यात नाही; तर आकडे स्वतंत्र अर्थतज्ज्ञांसमोर खुले ठेवण्यात आहे.

जीडीपी चा आकडा ७.८ टक्के असेल तर तो आनंदाचा विषय आहे. पण त्या वाढीचा लाभ किती लोकांपर्यंत पोहोचला, रोजगार किती निर्माण झाले, वास्तविक वेतन किती वाढले आणि ग्रामीण भारताची क्रयशक्ती किती मजबूत झाली, याचे उत्तरही त्याच उत्साहाने द्यावे लागेल. कारण कागदावरची अर्थव्यवस्था आणि माणसाच्या खिशातील अर्थव्यवस्था यात फरक असतो. सरकारने हा फरक मिटवला तर ७.८ टक्के हा केवळ आकडा राहणार नाही; तो जनतेच्या जीवनातील बदल बनेल. पण आकडे वाढत असताना प्रश्नही वाढत राहिले, तर आर्थिक विकासाच्या जाहिरातीपेक्षा आर्थिक पारदर्शकतेचा हिशेब अधिक महत्त्वाचा ठरेल. आज देशाला '७.८ टक्के'वर टाळ्या वाजवायला सांगण्यापेक्षा एकच गोष्ट हवी आहे. या ७.८ टक्क्यांचा प्रत्येक पैशाशी, प्रत्येक रोजगाराशी आणि प्रत्येक भारतीयाच्या जीवनमानाशी असलेला संबंध स्पष्ट करणारा हिशेब. नाहीतर विकासाचा फुगा कितीही मोठा फुगवला, तरी सुई जनतेच्या प्रश्नांचीच असेल.

# कॉकरोज जनता पार्टीच्या रडारवर आता आयपीएस सचिन शर्मा

## दोन मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त केले, संसद मार्ग पोलीस ठाण्याच्या बाहेर आंदोलन

**दिल्ली । वृत्तसंस्था**

**कॉकरोज जनता पार्टीचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने सीजेपी समर्थकांनी शुक्रवारी (दि. ४ सप्टेंबर) रोजी पुन्हा एकदा मोठे आंदोलन केले. त्यांनी दिल्लीतील संसद मार्ग पोलीस ठाण्याच्या बाहेर येऊन स्वयमघोषित हिंदुत्व इन्फ्लुएन्सर स्वतंत्र भारद्वाज याच्याविरूद्ध कारवाई करण्याची मागणी केली.**

सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे. त्यात स्वतंत्र भारद्वाजने एका आंदोलन करणाऱ्या विद्यार्थिनीच्या वडिलांना मारहाण केल्याचा दावा केला जात आहे. आंदोलकांनी या प्रकरणी दिल्ली पोलीसांविरूद्ध घोषणाबाजी करत आरोप केला की भारद्वाज विरूद्ध कडक कारवाई होत नाहीये. आझाद समाज पार्टी (काशीराम) चे प्रमुख आणि खासदार चंद्रशेखर आझाद देखील यावेळी सीजेपी समर्थकांसोबत पोलीस ठाण्याच्या परिसरात होते.

कॉकरोज जनता पार्टीचे संयोजक अभिजीत दिपकेने एक्सवर पोस्ट करत अधिकारी डीसीपी सचिन शर्मा यांनाच रडावर घेतले. त्यांनी स्वतंत्र भारद्वाजविरूद्ध कारवाई का केली जात नाही अशी विचारणा करीत थेट उच्च अधिकाऱ्यांनाच टार्गेट केले आहे. दिपकेने सचिन शर्मा यांच्यावर थेट हल्ला करत हिंदुत्ववादी गुंडांचे समर्थन करण्याचा आरोप त्यांच्यावर केला. सचिन शर्मा यांना असे करताना लाज वाटत नाही का, असे देखील दिपके म्हणाले. त्यांनी दोन मुलींचे आयुष्य दिल्ली पोलिसांनी उद्ध्वस्त केल्याचा आरोप केला. अभिजीत दिपके आपल्या ट्विटमध्ये लिहिले आहे की, दिल्ली पोलीस आणि डीसीपी सचिन शर्मा यांना लाज वाटायला पाहिजे. त्यांनी दोन मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त केले आहे. त्यांनी वर्दीचा अपमान केला आहे. पुढच्या ट्विटमध्ये दिपके लिहितात की, डीसीपी सचिन शर्मांना हे सांगवे लागेल की संघी गुंडाला अजूनपर्यंत अटक का केलेली नाही. ते एक कट्टर संघी आहेत म्हणून त्यांनी अटक केली नाही का? ही माहिती मला त्यांच्याच विभागातील लोकांनी दिली आहे. पीडित विद्यार्थी निशू आझाद यांच्याबद्दल बोलताना दिपके यांनी अजून एक पोस्ट लिहिली, जेंव्हा निशूच्या वडिलांवर संघी गुंडांनी हल्ला केला त्यावेळी ती रडत डीसीपी सचिन शर्मा आणि दिल्ली पोलीसांकडे गेली आणि दोषींना अटक करण्यासाठी विनंती करू लागली. मात्र दोन महिने झाले तरी हे गुंड खुलेआम फिरत आहेत. या गुन्ह्यात मदत करणाऱ्या डीसीपी सचिन शर्मा यांच्यावर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. सचिन शर्मावर जंतर मंतरवर झालेल्या कॉकरोज जनता पार्टीच्या आंदोलनावेळी कायदा आणि सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी होती. ते राजकीय हिंसाचारावरून देखील वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. सोशल मीडियावर एक व्हायरल होत असलेल्या व्हिडिओत भारद्वाज स्वतःला कट्टर हिंदू म्हणतो आणि याच व्हिडिओत तो निशू आझाद याच्या वडिलांची खोपडी फोडण्याची भाषा देखील करताना दिसतोय. या व्हिडिओत हा भारद्वाज म्हणतो की, तुम्हाला माहिती आहे का की या गुन्ह्यासाठी कोणते कलम लागते. कलम ३०७. त्यांना ६० टाके घालावे लागले होते. ते गंभीर स्थितीत होते. त्यांची मुलगी पोलीस ठाण्याच्या बाहेर उभी होती अन् ती न्याय मिळाला नाही तर आत्महत्या करणार असे म्हणाली होती. तरी देखील मी जेलमध्ये गेलो नाही. सगळ्या जगाला माहिती असायला पाहिजे की मी पूर्ण रात्र बाहेर फिरत होतो, असे म्हटले गेले आहे.

# विलास जाधव बीड जि.प.चे प्रभारी सीईओ



**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी जितिन रहमान हे दि.४ सप्टेंबर पासून रजेवर गेले आहेत. जिल्हा परिषदेच्या सीईओ'चा अतिरिक्त कार्यभार अतिरिक्त कार्यभार जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव यांच्याकडे देण्यात आला आहे.**

छत्रपती संभाजी नगरच्या विभागीय आयुक्तांनी सदर आदेश दि. ४ सप्टेंबर रोजी निर्गमित केले आहेत. यापूर्वी विकास जाधव यांच्याकडे दोन वेळा १५ दिवसासाठी अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील या रजेवर असल्याने प्रकल्प संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार जाधव यांच्याकडे दिला जाणार असल्याचे समजते.


# बीडमध्ये उद्या 'शिवरत्न जिवाजी महाले चौका'चे भव्य उद्घाटन

## शिवभक्तांसह सकल नाभिक समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे; आयोजन समितीचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानाचा अमर वारसा जपणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे निष्ठावंत मावळे शिवरत्न जिवाजी महाले आणि वीर शिवा काशीद यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बीड शहरातील अहिल्यानगर रोडवरील चंपावती शाळेजवळील चौकास 'शिवरत्न जिवाजी महाले चौक' असे नामकरण करण्यात आले आहे. या चौकाचे भव्य उद्घाटन शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.**

बीड नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष विनोद मुळूक यांच्या शुभहस्ते उद्घाटन होणार असून यावेळी नगरसेवक रणजीत




बनसोडे, प्रमोद शिंदे, भैय्यासाहेब मोरे, राजाभाऊ गुजर, मुन्ना गायकवाड, मुस्तफा सय्यद, भीमराव वाघचौरे मामा, भारत कांबळे तसेच माजी नगरसेवक विलास विधाते, किशोर गाडेकर, विठ्ठल घोडके, धर्मराज वाघमारे, बिडवे गौतम (नाना), मुकुंद काळे, विक्रम बिडवे, विलास सरडे, सुनील दोडके, अशोक दोडके आणि राजू शिंदे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या इतिहासात आपल्या शौर्य, निष्ठा आणि पराक्रमाने अजरामर ठरलेल्या शिवरत्न जिवाजी महाले यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा हा विशेष प्रसंग आहे. त्यामुळे शिवभक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी शिवरत्न जिवाजी महाले प्रेमी, शिवभक्त तसेच सकल नाभिक समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक व बीड जिल्हा सकल नाभिक समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

# पशुपालकांच्या मागणीची दखल; चिखला येथे नवीन पशुवैद्यकीय चिकित्सालय मंजूर

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी पशुपालकाची मागणीची दखल घेऊन लातूर जिल्हयातील चिखला (ता. अहमदपूर) येथे नवीन पशुवैद्यकीय चिकित्सालय मंजूर केले असून पशुसंवर्धन विभागाने तसा अध्यादेश काढला आहे. गेल्या दहा वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न सुटल्याने पशुपालकांनी आनंद व्यक्त करत त्यांचे आभार मानले आहेत.**

चिखला येथील पशुपालक आणि सामाजिक कार्यकर्ते बालासाहेब होळकर हे सन २०१६ म्हणजेच गेल्या दहा वर्षांपासून चिखला येथे पशुवैद्यकीय चिकित्सालय व्हावे यासाठी प्रयत्न करत होते. काही दिवसापूर्वी त्यांनी जनता दरबारात ना. पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन चिकित्सालयाची मागणी केली होती, ना. पंकजाताईंनी तात्काळ याची दखल घेऊन विभागाला निर्देश दिले, त्यानंतर आज पशुसंवर्धन विभागाने चिकित्सालय मंजुरीचे आदेश निर्गमित केले. या नवीन पशुवैद्यकीय चिकित्सालयात आवश्यक तीन पदे मंजूर करण्यात आली असून त्यात पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व बाह्य यंत्रणेद्वारे बहुउद्देशीय कर्मचारी या पदाचा समावेश आहे. दरम्यान गेल्या अनेक वर्षांपासूनचा प्रलंबित प्रश्न तातडीने दखल घेऊन सोडविल्याबद्दल पशुपालकांनी आनंद व्यक्त करत पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# जि.प. शाळांच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एसएफआय-डीवायएफआयचे धरणे




**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या विविध समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी एसएफआय आणि डीवायएफआयच्या वतीने जिल्हा परिषद कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. आंदोलनाचा शुक्रवारी तिसरा दिवस असून, अद्याप जिल्हा परिषद प्रशासनाने आंदोलनाची दखल घेतली नसल्याचा आरोप संघटनांनी केला आहे.**

एसएफआय आणि डीवायएफआयने राज्यभर 'शाळा वाचवा, शाळा सुधारा' ही मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत बीड जिल्ह्यातील काही जिल्हा परिषद शाळांची पाहणी करण्यात आली. अनेक शाळांमध्ये पायाभूत सुविधांचा अभाव, शिक्षकांची रिक्त पदे आणि इतर समस्या गंभीर असल्याचे संघटनांनी सांगितले. पटसंख्येचे कारण देऊन शाळा बंद करू नयेत, शिक्षकांची रिक्त पदे तातडीने भरावीत, क्लार्क व शिपाई पदांची भरती करावी, इमारती नसलेल्या शाळांसाठी नवीन इमारती उभाराव्यात, तसेच प्रत्येक सरकारी शाळेचे स्वतंत्र पायाभूत सुविधा ऑडिट करून वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, पिण्याचे पाणी, वीज, संरक्षण भिंत, प्रयोगशाळा, ग्रंथालय आणि क्रीडा सुविधांसाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत. शिक्षकांनी वेळेत शाळेत हजर राहावे, कर्तव्यात हलगर्जीपणा करणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, शिक्षकांना अतिरिक्त कामे देऊ नयेत तसेच शाळेच्या परिसरातील फोटो व व्हिडिओ काढण्यावर प्रतिबंध घालू नये, अशीही मागणी संघटनांनी केली आहे. या आंदोलनाचे नेतृत्व युवा राज्याध्यक्ष मोहन जाधव, एसएफआयचे राज्याध्यक्ष रोहिदास जाधव, राज्य सचिव मंडळ सदस्य विशाल देशमुख आणि जिल्हाध्यक्ष सुहास झोडगे करत आहेत. आंदोलनाला मानवी हक्क अभियानाचे जिल्हाध्यक्ष विष्णू मुजमुले व डॉ. संजय तांदळे यांनी पाठिंबा दिला. आंदोलनात विविध पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

## पान १ वरून...

### राज्यात पावसाची ओढ ;

राज्यातील ३६ पैकी तब्बल ३१ जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत अत्यल्प पाऊस झाला आहे. १ जून ते ३१ ऑगस्ट या कालावधीत राज्यात ७१७.४ मिलिमीटर पाऊस झाला असून, तो सरासरीच्या तुलनेत १२ टक्के कमी असल्याचे रोहित पवार यांनी पत्रात नमूद केले आहे. जूनमध्ये केवळ ११०.६ मिलिमीटर पाऊस झाला. हा पाऊस अत्यंत असमान होता आणि सरासरीपेक्षा ४७ टक्के कमी होता. जुलैमध्ये ४५४.२ मिलिमीटर पाऊस झाला असला तरी ऑगस्टमध्ये पुन्हा पावसाने मोठी ओढ दिली. ऑगस्टमध्ये केवळ १५२ मिलिमीटर पाऊस झाला असून, तो सरासरीपेक्षा ४६ टक्के कमी आहे. विभागनिहाय परिस्थिती पाहता मराठवाड्यात ६९ टक्के, विदर्भात ६१ टक्के, कोकणात ३३ टक्के, तर पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत २६ टक्क्यांपर्यंत पावसाची तूट असल्याचा दावा त्यांनी केला आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, बाजरी, मका, तूर, मूग आणि उडीद यांसह विविध पिके करपण्यास सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर पिकांवर कीड व रोगांचा प्रादुर्भावही वाढत असल्याचे रोहित पवार यांनी निदर्शनास आणून दिले. दुष्काळ जाहीर करण्यासाठी असलेल्या औपचारिक निकषांची पूर्तता होण्याची वाट पाहण्यापेक्षा सरकारने सध्याची प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी रोहित पवार यांनी केली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, पीक नुकसानभरपाई आणि आवश्यक मदत देण्यासह पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

---------

### सीईटीच्या विद्यार्थ्यांचा

यांनी आझाद मैदान पोलिसांना अधिकृत पत्र सुपूर्द केले. या पत्रात पोलिसांनी नियमांनुसार तात्काळ आवश्यक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाच्या पोलीस तपासात सीईटी सेलकडून पूर्ण सहकार्य केले जाईल, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या गोपनीयतेचा हा प्रश्न असल्यामुळे पोलीस या प्रकरणात नेमका काय तपास करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-------------

### प्रचलित पद्धतीनेच संचमान्यता

करण्यात यावी, या मागणीसाठी राज्यभरातून हजारो शिक्षकांनी शुक्रवारी शिक्षण आयुक्त कार्यालयाबाहेर घोषणाबाजी करून तीव्र आंदोलन केले. सुधारीत संचमान्यता रद्द करण्याबरोबरच इतर प्रमुख मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघातर्फे राज्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ.महेश पालकर यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाचे पदाधिकारी प्रा. संतोष फाजगे, प्रा. लक्ष्मण रोडे, प्रा. डॉ. अविनाश बोर्डे, प्रा. मुकुंद आंदळकर, प्रा. डॉ. संजय शिंदे यांच्यासह माजी आमदार दत्ता सावंत, भगवान साळुंखे,आगामी पुणे शिक्षक मतदार संघ निवडणुकीस इच्छुक उमेदवार प्रा.सचिन सानप, कौस्तुभ गावडे, विक्रम काळे, डॉ.अशोक गव्हाणकर,डॉ.अविनाश बोर्डे, रवींद्र पाटील, रविंद्र भदाणे, दिलीप शितोळे आदी उपस्थित होते. या आदोलनास राज्यभरातून शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरम्यान,ऑनलाइन संचमान्यतेतील निकषांमध्ये बदल करण्याच्या प्रस्तावाला महासंघाने यापूर्वीही विरोध केला आहे. याबाबत शासनाकडे निवेदने देणे, अधिकाऱ्यांच्या भेटी घेणे तसेच विविध टप्प्यांवर आंदोलने करण्यात आली. ११ मे २०२६ रोजी मोर्चासाठी पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतर महासंघाने वेळोवेळी धरणे आंदोलन केले होते. शिक्षण विभागाच्या कार्यालयावर ४ सप्टेंबर रोजी मोर्चा काढण्याबाबत प्रशासनाला पूर्वसूचना देण्यात आली होती. मात्र, पोलिसांनी मोर्चा तसेच धरणे आंदोलनास परवानगी नाकारल्याने महासंघाच्या वतीने संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. महासंघाने सुधारीत संचमान्यता नाकारली असून तसे पत्रही दिले आहे. सुधारित संचमान्यतेमुळे शिक्षण क्षेत्रावर विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे शासनाने प्रचलित संचमान्यता कायम ठेवावी, अशी महासंघाची भूमिका आहे. वरिष्ठ महाविद्यालयास जोडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील तासिकेचा कालावधी पूर्वीप्रमाणे ४५ मिनिटांचा ठेवावा, विज्ञान विषयाच्या प्रॅक्टिकल बॅचसाठी पूर्वीप्रमाणे २० विद्यार्थ्यांची मर्यादा कायम ठेवावी. ती ३० विद्यार्थ्यांपर्यंत वाढवू नये, अशी महासंघाची प्रमुख मागणी आहे. शासन नियमानुसार पूर्णवेळ शिक्षकांचा आठवड्याचा कार्यभार १७ घड्याळी तास, तर अर्धवेळ शिक्षकांचा कार्यभार ८.३० तास असावा, शासन आदेशानुसार आदिवासी व डोंगराळ भागात २० ते ३० विद्यार्थ्यांसाठी एक तुकडी मंजूर करावी, शासन आदेशानुसार एखाद्या तुकडीत १५ मुली असतील, तर ती तुकडी मान्य करावी, तसेच ४० किंवा ३० विद्यार्थी असलेल्या तुकड्यांबाबत शासन आदेशानुसार आर्थिक दंडाची तरतूद लागू करून तुकडी मंजूर करण्याची मागणी महासंघाने केली आहे.

--------------

### सरकारी शाळांत बाहेरच्या

न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा आहे. राजस्थानच्या माध्यमिक शिक्षण संचालकांच्या १६ ऑगस्टच्या परिपत्रकानुसार, सरकारी शाळेत प्रवेश करण्यासाठी बाहेरील व्यक्तींना मुख्याध्यापकांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. तसेच छायाचित्रण, चित्रीकरण, मुलाखत, ध्वनिमुद्रण आणि थेट प्रक्षेपणासाठीही पूर्वलिखित परवानगी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याला या याचिकेत आव्हान देण्यात आले होते. याचिकेत अयोध्येच्या जिल्हा मूलभूत शिक्षण अधिकाऱ्यांनी १९ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या आदेशालाही आव्हान देण्यात आले होते. विधि विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे नियमन वा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय) व राज्य बार कौन्सिलला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला. विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा अधिकार संबंधित शिक्षणसंस्थेलाच असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हैदराबादच्या नालसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांच्या प्रस्तावित दीक्षांत समारंभातील सहभागाला आक्षेप घेतला होता. त्यावर बीसीआयने नालसारच्या विद्यार्थ्यांची वकील म्हणून नोंदणी तूर्तास थांबवण्याचे निर्देश दिले होते.

-------------

### 'ते शिव्या देताय तरी मंत्री पाय

आणू नये. राज्यातील महायुतीच्या नेत्यांनी लक्षात घ्यावे ओबीसींनी निवडणुकीत तुम्हाला मदत केली आहे. तुमचं सरकार आणण्यात ओबीसींचा महत्त्वाचा हातभार आहे, असे म्हणत छगन भुजबळ यांनी आपल्याच महायुती सरकारला घरचा आहेर दिला. आता तुम्ही म्हणता मराठा कुणबी स्वतंत्र्य मंत्रालय सुरु करा. आता हे कसं काय होईल? मंत्रालय करायचं असेल तर सर्वच जातींसाठी करा. आमचा दाखल्याला विरोध नाही. मात्र, ओबीसी आरक्षण संपणार नाही हेही बघितलं पाहिजे. सरकारने स्पष्टता आणायला हवी. कधी आरक्षण घेत आहे. कधी आरक्षण घेत आहेत, तर कधी आरक्षण घेत आहेत. नक्की कुठलं आरक्षण तुम्हाला पाहिजे? एक विद्यार्थी तीन आरक्षणाचा कसा काय फायदा घेऊ शकतो? असा सवालही त्यांनी केला. आमचे मंत्री सतत लाड पुरवण्यासाठी जात आहे, एक लाड गेले होते लाड पुरवायला असा टोलाही भुजबळांनी लगावला. समोरुन टिंगल केली जातेय, शिव्या दिल्या जाताय तरी मंत्री पाय धरायला जातात. दुसरीकडे कुणी एक शब्द जरी मुख्यमंत्र्यांच्या विरोधात बोललं तरी त्याला पोलिस जाऊन पकडतात. इथे तर सगळं सर्रास सुरु आहे. महाराष्ट्राची संस्कृती आहे, असं भुजबळ म्हणाले.

-----------

### फुकट राबवून हमाली करून

६ ते १५ तास विनावेतन अतिरिक्त काम करतात. म्हणजेच सर्वेक्षणातील जवळपास दोन-तृतीयांश भारतीय कर्मचारी आठवड्यात किमान सहा अतिरिक्त तास काम करत असल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे या अतिरिक्त कामासाठी त्यांना स्वतंत्र मोबदला मिळत नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. विनावेतन १६ तास किंवा त्याहून अधिक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रमाणात तुर्की २३ टक्क्यांसह दुसऱ्या, तर ऑस्ट्रिया २१ टक्क्यांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. अमेरिकेत हे प्रमाण २० टक्के आहे. त्याउलट झेक प्रजासत्ताकमध्ये केवळ ४ टक्के कर्मचाऱ्यांनी १६ तास किंवा त्याहून अधिक विनावेतन काम करत असल्याचे सांगितले. चीन, तैवान आणि जपानमध्ये हे प्रमाण सुमारे ६ टक्के आहे. एडीपीच्या मते, विनावेतन कामामध्ये दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत कार्यालयीन काम करणे, नियमित कार्यालयीन वेळ संपल्यानंतरही काम सुरू ठेवणे अशा स्वरूपाच्या अतिरिक्त कामाचा समावेश होतो. या आकडेवारीमुळे भारतातील कर्मचाऱ्यांवरील कामाचा वाढता ताण, अतिरिक्त कामाचे तास आणि त्याबदल्यात मिळणारा मोबदला याबाबत पुन्हा एकदा गंभीर चर्चा होण्याची शक्यता आहे.

------------

### शिवभोजनसाठी ७२ कोटी

अधिकारी कार्यालयांना वितरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी व उपनियंत्रक, शिधावाटप यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदान १२०.०० कोटी पैकी वित्त विभागाने ७२ कोटी उपलब्ध करुन दिले आहेत. मार्च २०२६ अखेर प्रलंबित देयकांची रक्कम ३२.९५ कोटी तसेच एप्रिल २०२६ व मे २०२६ मध्ये प्रत्यक्ष वितरीत केल्याप्रमाणे शिवभोजन ॲपवरील थाळींनुसार ३६.३६ कोटी असे एकूण ६९.३१ कोटी इतका निधी मुक्त करण्यात आला आहे. हे अनुदान ज्या कारणासाठी मंजूर करण्यात आले आहे त्याचसाठी खर्च करावे. सदर रक्कम दुसऱ्या कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता येणार नाही अथवा वळती करता येणार नाही. त्यासाठी शासनाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची सूचना करण्यात आली आहे. शिवभोजन केंद्र चालकांना अनुदान अदा करताना शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या निर्णयातील अटी व शर्ती तसेच मार्गदर्शक सुचनांनुसार देयकांची पडताळणी करण्याची जबाबदारी सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी, अन्नधान्य वितरण अधिकारी, उपनियंत्रक शिधावाटप कार्यालयातील संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांची आहे, असे शासन निर्णयात नमूद केले आहे. शिवभोजन थाळी योजना २६ जानेवारी २०२० रोजी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वाखालील तत्कालीन सरकारने सुरू केली होती. दोन चपाती, एक वाटी भाजी, एक वाटी वरण आणि भात असे जेवण केवळ १० रुपयांना दिले जाते. यासाठी सरकारकडून केंद्र चालकांना अनुदान देण्यात येते. ही योजना राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून राबवली जात आहे.

---------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि.०५ सप्टेंबर २०२६
३



## चौसाळा येथील सप्ताहाची आज सांगता,लक्ष्मण महाराज मेंगडेंचे कीर्तन

चौसाळा । प्रतिनिधी

येथील हनुमान मंदिरात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची, ग्रंथराज पारायण व दैनंदिन कीर्तन महोत्सवाची सांगता आज (दि.५) सप्टेंबर रोजी महंत लक्ष्मण मेंगडे यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.तरी या सोहळयाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विष्णू महाराज बादड तळणीकर यांच्या रामकथेचे विशेष आयोजन करण्यात आले होते. भाविक भक्तांसमोर त्यांनी अतिशय ओघवत्या शैलीत रामकथेचे निरूपण केले.तसेच सप्ताहात आयोजित कीर्तन व प्रवचन सेवेत नामदेव महाराज कवडे, नवनाथ महाराज औताडे, राजेंद्र महाराज चोरडिया, वर्षा काळे आदी मान्यवर कीर्तनकारांनी आपली कीर्तनसेवा रुजू केली. तर जीवन महाराज जोगदंड, रमेश जाधव, प्रयागा माने, उषा हासेगावकर यांनी प्रवचनसेवा दिली.तर आज (दि. ५) सप्टेंबर सकाळी १० च्या दरम्यान आयोजित काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी व मजुरांना आर्थिक मदत करा –कुरे



माजलगाव । प्रतिनिधी

पाऊस न पडल्यामुळे बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुक्यात दुष्काळ दृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून किसान सभा व महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन या संघटनेच्या वतीने शिवाजी कुरे यांच्या नेतृत्वाखाली माजलगाव तहसीलदार यांना निवेदन देऊन बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा अशी मागणी करण्यात आली.


बीड जिल्ह्यासह माजलगाव तालुक्यातील ऊस, सोयाबीन, कापूस व इतर पिके पाऊस न पडल्यामुळे धोक्यात आलेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच शेतीवर अवलंबून असणारा शेतमजुरही अडचणीत आला आहे. म्हणून संघटनेच्यावतीने महाराष्ट्र शासनाकडे मागणी करण्यात आली आहे की, शासनाने जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ७० हजार रुपये तात्काळ मदत जाहीर करावी,सन २०२५ ला घोषित केलेली हेक्टरी सतरा हजार पाचशे मदत तात्काळ वाटप करावी, त्याचबरोबर शेतावर अवलंबून असणारे मजूर यांनाही श्रम नुकसान भरपाई देण्यात यावी, रोजगार हमीचे कामे त्वरित काढण्यात यावीत. या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्याही दिलेल्या निवेदनात करण्यात आलेले आहेत.यावेळी भा.क.प. तालुका सचिव शिवाजी कुरे यांच्यासह किसान सभा तालुका सचिव कृष्णा सोळंके, तालुका उपाध्यक्ष गणेश कदम उपस्थित होते.

# मराठवाड्यात ‘कोरडा दुष्काळ’ जाहीर करा - आ.सोळंके

## आ. सोळंके यांची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

मराठवाड्यात, विशेषतः बीड जिल्ह्यात यंदा पावसाचे अत्यल्प व अनियमित प्रमाण, पावसातील मोठे खंड आणि जलसाठ्यांमध्ये झालेली घट यामुळे गंभीर दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका शेतकरी, शेतमजूर, पशुपालक तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना बसत असून, मराठवाड्यात ‘कोरडा दुष्काळ’ जाहीर करून तातडीने उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सुंदरराव सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात आमदार सोळंके यांनी म्हटले आहे की, पावसाचे अत्यल्प व अनियमित प्रमाण तसेच पावसातील दीर्घ खंडामुळे मराठवाड्यातील अनेक भागांत गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. खरीप हंगामातील पिकांची वाढ खुंटल्यामुळे पिके पूर्णपणे वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, खरीप पिकांच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. पिकांच्या नुकसानीसोबतच जनावरांच्या चारा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही दिवसेंदिवस गंभीर होत आहे. विहिरी, तलाव, बंधारे व इतर जलस्रोतांमधील पाणीसाठा कमी होत असल्याने आगामी काळात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे परिस्थिती केवळ शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीपुरती मर्यादित राहणार नसून, त्याचा परिणाम संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणार असल्याचे आमदार सोळंके यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### तात्काळ पंचनामे करून मदत द्या

सध्याच्या परिस्थितीचा तातडीने आढावा घेऊन खरीप पिके,फळबागा व ऊसासह नगदी पिकांचे पंचनामे करावेत,तसेच पीक विमा कंपन्यांना नुकसानीची भरपाई अदा करण्याचे निर्देश द्यावेत,अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी मागणीनुसार तात्काळ टँकर सुरू करावेत, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे आणि दुष्काळग्रस्तांना मदत देण्यासाठी त्वरित उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# एसटी महामंडळाच्या ‘राष्ट्रीय प्रवास कार्ड’च्या नावाखाली सामान्य प्रवाशांची उघड आर्थिक लूट!

**५०% सवलतीचा ‘आवळा’ देऊन १९९ रुपयांचा ‘कोहळा’ काढला; १८% वस्तू व सेवा कर अन् सेवा केंद्रांच्या अतिरिक्त वसुलीने प्रवासी त्रस्त**

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) प्रवाशांच्या सोयीसाठी आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी लागू केलेले ’राष्ट्रीय सामायिक गतिशीलता प्रवास कार्ड’ (एन सी एम सी) सध्या सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर मोठा दरोडा ठरत आहे. ’आधुनिक सेवा’ आणि ’विना-रोख व्यवहार’ या नावाखाली महामंडळ, संबंधित वित्त संस्था (बँक) आणि शासन मिळून राज्यातील गरीब व मध्यमवर्गीय प्रवाशांची आर्थिक पिळवणूक करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

सवलतीचा आवळा, करांचा अन् शुल्काचा कोहळा

शासनाने महिलांसाठी ’महिला सन्मान योजने’अंतर्गत ५० टक्के प्रवास भाडे सवलत जाहीर केली खरी, परंतु या सवलतीचा लाभ घेण्यासाठी प्रवाशांना हे नवीन प्रवास कार्ड काढणे अनिवार्य केले जात आहे. पावतीतील अधिकृत नोंदीनुसार, एका कार्डसाठी १६८ रुपये नोंदणी शुल्क आणि त्यावर ३१ रुपये (१८ टक्के वस्तू व सेवा कर - जीएसटी) असे एकूण १९९ रुपये वसूल केले जात आहेत. एकीकडे प्रवाशांना ५० टक्के सवलत देण्याचे भासवायचे आणि दुसऱ्या बाजूला कार्ड नोंदणी शुल्क व १८ टक्के कराच्या नावाखाली प्रवाशांच्याच खिशाला कात्री लावायची, असा हा प्रकार चालला आहे.

**सेवा केंद्रांची अतिरिक्त वसुली व संगनमत**

शासकीय पावतीवर १९९ रुपये शुल्क नोंदवलेले असताना, प्रत्यक्ष ग्रामीण भाग आणि शहरांमधील महा-ई-सेवा केंद्र व सेतू केंद्र चालकांकडून हे कार्ड काढून देण्यासाठी प्रवाशांकडून अतिरिक्त ५० रुपये रोख वसूल केले जात आहेत. यामुळे एका गरीब प्रवाशाला सवलतीचे हे कार्ड मिळवण्यासाठी तब्बल २५० रुपये मोजावे लागत आहेत. एसटी महामंडळ, संबंधित वित्त संस्था आणि सेवा केंद्र चालक यांच्या संगनमतामुळे सर्वसामान्य नागरिक पूर्णपणे भरडला जात आहे.

आगाऊ रकमेच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची बिनव्याजी ठेव

हे कार्ड फक्त खरेदी करून भागणार नाही, तर प्रवास करण्यासाठी प्रवाशांना आधीच त्या कार्डमध्ये विशिष्ट रक्कम जमा (रिचार्ज) करून ठेवावी लागते. महाराष्ट्रातील कोट्यवधी प्रवाशांचे अब्जावधी रुपये या कार्ड्सच्या माध्यमातून संबंधित वित्त संस्था आणि महामंडळाकडे ’आगाऊ ठेव’ स्वरूपात जमा राहणार आहेत. या रकमेवर बँका व्याज कमावणार, तर सामान्य प्रवाशांचे पैसे मात्र कार्डमध्ये अडकून पडणार आहेत. हा जनतेच्या पैशांवर केलेला एक प्रकारचा आर्थिक दरोडाच आहे.

**विरोधी पक्ष गप्प का? प्रवाशांचा संतप्त सवाल**

एवढ्या मोठ्या प्रमाणावर गरीब आणि सामान्य प्रवाशांची लूट सुरू असताना राज्यातील एकाही विरोधी पक्षाने किंवा लोकप्रतिनिधीने याविरोधात आवाज उठवलेला नाही. मूळ सरकारी ओळखपत्र (उदा. आधार कार्ड) दाखवून प्रवाशांना सवलत का दिली जात नाही? या महागड्या कार्डची सक्ती कशासाठी? असा थेट सवाल प्रवासी विचारत आहेत.

पान ६ वरुन...

### कमरेला गावठी कट्टा लावून

असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या झडतीत कमरेला लावलेला एक देशी कट्टा (पिस्तूल) व चार जिवंत काडतुसे मिळून आली. पोलिसांनी ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करत आहेत. सदरची धडक कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी व्यंकटराम, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक धनराज जारवाल, पोलीस हवालदार दीपक खांडेकर, गोविंद राख, आनंद मस्के, भागवत शेलार, गणेश हांगे व सारणीकर यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### केज मतदारसंघात आगामी

करण्यासाठी गावागावांत संपर्क वाढविण्यात येत असून आगामी काळात अनेक नवीन कार्यकर्ते शिवसेनेच्या प्रवाहात येतील. पक्षात येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याला योग्य सन्मान देऊन त्याला संघटनेत काम करण्याची संधी दिली जाते.शिवसेनेची ताकद ही कार्यकर्त्यांमध्ये असल्याचे मुळूक म्हणाले. यावेळी शिवसेना जिल्हा संघटक योगेश नवले, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील, युवासेना तालुकाप्रमुख दत्तकुमार काकडे, शहरप्रमुख प्रकाश गुंड, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, विभागप्रमुख मोहन ढाणे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी आणि शिवसैनिक उपस्थित होते.

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांच्या या संवेदनशील आणि तत्पर भूमिकेमुळे रमाबाईंच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. जिल्हा प्रशासनाने वेळेवर दिलेल्या या आर्थिक बळामुळे मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार असल्याची भावनाही रमाबाई रणवीर यांनी यावेळी बोलून दाखविली.अंबाजोगाई येथे भारती शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने अमृत-२ मॅरेथॉन स्पर्धेचे दि.२९ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजन करण्यात आले होते. या मॅरेथॉन स्पर्धेत कौटुंबिक हलाखीची परिस्थिती व मुलींचे शैक्षणिक शुल्क भरावयाचे असल्याने जिद्द मनात बाळगून अनवाणी पायाने धावून मॅरेथॉन स्पर्धेतील विजेत्या ठरलेल्या रमाबाई रणवीर यांच्या पाठीवर जिल्हा प्रशासनाकडून कौतूकाची थाप देण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी प्रथमत: मनमोकळेपणाने संवाद साधत रमाबाईंचा यथोचित सन्मान करून त्यांना ५० हजार रुपयांची रोख मदत सुपूर्द करुन आपली संवेदनशीलता दाखवून दिली.

### गणेशोत्सव अवघ्या दहा

वाहतूक खर्चही वाढल्याने यंदा गणेशमूर्तींच्या किमती वाढण्याची शक्यता आहे.

महागाईमुळे बाप्पाही महागणार!

गणेशमूर्तींच्या किमती वाढल्याचा थेट परिणाम सर्वसामान्य गणेशभक्तांच्या खिशावर होणार आहे. दरवर्षी श्रद्धेने आणि उत्साहाने घरी बाप्पाची प्रतिष्ठापना करणाऱ्या भाविकांना यंदा मूर्तीसाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आनंदासोबतच वाढलेल्या खर्चाचे गणितही भक्तांना सांभाळावे लागणार आहे.

एकीकडे महागाईचा वाढता आलेख आणि दुसरीकडे बाप्पाच्या स्वागताचा कायम असलेला उत्साह, अशा दुहेरी परिस्थितीत यंदाचा गणेशोत्सव साजरा होणार आहे. महागाई कितीही वाढली तरी बाप्पाच्या स्वागतातील भक्तिभाव आणि उत्साह कमी होणार नाही यात मात्र किंचित ही शंका नाही.

### गंगामसला येथे मनोज जरांगे यांच्या

समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर तोडगा काढून त्यांचे उपोषण मागे घेण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी शिवराज सोळंके यांनी केली आहे. शिवराज सोळंके यांच्या या उपोषणामुळे गंगामसला परिसरात मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### कुप्पा-परडी माटेगाव रस्त्याचे काम

संबंधित एजन्सी (ठेकेदार) यांना तात्काळ कल्पना देऊन कामाला गती देण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या आदेशाने, संबंधित मार्गावरील नागरिकांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) यांच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती आमदार प्रकाशदादा सोळंके तसेच बीड जिल्हाधिकारी यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. त्यामुळे प्रशासन आता या रस्त्याच्या कामाला कितपत गती देते, याकडे कुप्पा, परडी माटेगाव परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना

त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये त्यांच्याबद्दल विशेष विश्वास निर्माण झाला आहे.

शिक्षक दिनी कार्याचा गौरव

शिक्षक दिनाच्या निमित्ताने प्रा. मल्लिकार्जुन गडकर यांच्या प्रदीर्घ शिक्षणसेवेचा आणि विद्यार्थी घडविण्याच्या कार्याचा गौरव करणे औचित्यपूर्ण ठरते. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची नाळ न सोडता ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी कार्यरत राहणे, ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विशेष ओळख आहे. ग्रामीण भागातील शेकडो विद्यार्थ्यांना शिक्षणाची दिशा देत त्यांना विविध क्षेत्रांत यशस्वी होण्यासाठी प्रेरणा देणाऱ्या प्रा. मल्लिकार्जुन गडकर सरांना शिक्षक दिनानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस आणि सामाजिक योगदानास हार्दिक शुभेच्छा.

# युसूफवडगाव ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन संपन्न

## दोन मजली इमारतीत सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय; पहिल्या मजल्यावर शॉपिंग कॉम्प्लेक्स

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव ग्रामपंचायतीच्या नवीन दोन मजली इमारतीच्या बांधकामाचा शुभारंभ सरपंच महेश गायके, उपसरपंच महेश लामतुरे व मान्यवरांच्या हस्ते पूजन व कुदळ मारून उत्साहात करण्यात आला. गावाच्या वाढत्या विस्ताराच्या तुलनेत सध्याचे ग्रामपंचायत कार्यालय अपुरे पडत असल्याने नवीन जागेत प्रशस्त व सर्व सुविधांनी सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

युसूफवडगांव येथे गेल्या अनेक वर्षांपासून जुन्याच ग्रामपंचायत कार्यालयातून कारभार सुरू होता. मात्र, गावाची वाढती लोकसंख्या, ग्रामपंचायतीचे वाढते कामकाज आणि नागरिकांच्या वाढत्या गरजा लक्षात घेता सद्यस्थितीतील



कार्यालयाची जागा अपुरी पडत होती. त्यामुळे ग्रामपंचायतीसाठी नवीन व प्रशस्त इमारत असावी, अशी ग्रामस्थांची अनेक दिवसांपासूनची मागणी होती.सरपंच महेश गायके व ग्रामपंचायत सदस्यांनी पुढाकार घेत हनुमान मंदिराजवळील निरुपयोगी अवस्थेत असलेले जुने मंगल कार्यालय पाडून त्याच जागेवर नवीन ग्रामपंचायत इमारत व शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जुन्या मंगल कार्यालयाचे बांधकाम हटविण्यात आले असून आता त्या जागेवर दोन मजली इमारत उभारण्यात येणार आहे.

इमारतीच्या पहिल्या मजल्यावर शॉपिंग कॉम्प्लेक्स, तर दुसऱ्या मजल्यावर सर्व सोयींनी सुसज्ज असे ग्रामपंचायत कार्यालय उभारण्यात येणार आहे. शॉपिंग कॉम्प्लेक्समधून ग्रामपंचायतीला नियमित उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणार असून, त्यातून भविष्यात गावातील विकासकामांना आर्थिक बळ मिळण्यास मदत होणार आहे.नवीन ग्रामपंचायत इमारतीमुळे नागरिकांना ग्रामपंचायतीशी संबंधित कामांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून, गावाच्या विकासात ही इमारत महत्त्वाची भर ठरणार आहे. यावेळी मन्मथ पाटील, रूपेश बोरगावकर, अशोक मोडवे, महारुद्र लामतुरे, रुदुनाना गडकर, शिवदास थळकरी, सचिन जावळे, सूर्यकांत थळकरी, संजय लांडगे, अरुण राऊत, दादा निकम, सिद्धू डोंगरे, रमेश निशिगंध, राजू गायके, अनिल निकम, विकास जाधव, प्रभाकर डिकुळे, महादेव मोडवे, जयराज निशिगंध, अनंत जाधव, अविनाश सातपुते, शिवराज थळकरी, मल्लिकार्जुन गडकर, जनक राऊत, भैय्या सावंत, छत्रुघ्न निकम यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त ह.भ.प. कुलस्वामिनी दीदी भंडारे यांची किर्तन सेवा

माजलगाव । प्रतिनिधी

पवित्र श्रावण मासानिमित्त येथील ग्रामदैवत कुशावर्त श्री मंगलनाथ मंदिर (बायपास रोड, माजलगाव) येथे ’संत श्री ज्ञानेश्वर महाराज जयंती’ आणि ’श्रीकृष्ण जन्माष्टमी’निमित्त विशेष धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याचा एक भाग म्हणून शुक्रवार, ४ सप्टेंबर रोजी रात्री १० ते १२ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. कुलस्वामिनी दीदी भंडारे (वृंदावन धाम) यांच्या सुश्राव्य हरिकीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले असून, ठीक रात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा पार पडणार आहे.

या कीर्तन सोहळ्यास मृदंगाचार्य म्हणून ह.भ.प. विठ्ठल महाराज आंबुरे साथसंगत करणार असून, गायनाचार्य म्हणून ह.भ.प. सुभाष महाराज होगे व ह.भ.प.



ऋषी महाराज सावंगीकर यांची संगीत साथ लाभणार आहे. या हरिनाम सप्ताहातील कीर्तन सेवा व श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळ्याचा माजलगाव शहरासह संपूर्ण पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे भावपूर्ण आवाहन श्री मंगलनाथ मंदिराचे अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज जाधव आणि समस्त श्री मंगलनाथ भक्त मंडळ, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चंपावती शाळेत विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे

## ‘सुरक्षित प्रवास, सुरक्षित जीवन’चा संदेश; पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर

बीड । प्रतिनिधी

विद्यार्थ्यांमध्ये वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती निर्माण व्हावी तसेच भविष्यातील जबाबदार नागरिक म्हणून त्यांनी रस्ते सुरक्षेचे भान ठेवावे, या उद्देशाने चंपावती शाळेत जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख तसेच प्रोबेशनरी डी.वाय.एस.पी. भरत पांढरे यांच्या आदेशानुसार हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आला. जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक शाखेच्या कर्मचार्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत रस्ते सुरक्षेबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापिका सौ.नयना कुलकर्णी, उपमुख्याध्यापक श्री.एम.पी.महाजन पर्यवेक्षक यु.एस.घाडगे, मराठी विषयाचे शिक्षक राहुल परळकर व पोलीस हवालदार अजिनाथ मुंडे यांची उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करतांना पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना घ्यावयाची काळजी, सिग्नलचे पालन, पादचारी मार्गाचा वापर, १८ वर्षांचे पुढे तुम्ही वाहन



चालवतांना दुचाकीवरून प्रवास करताना हेल्मेटचा वापर, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे, वेगावर नियंत्रण ठेवणे तसेच वाहतुकीच्या विविध नियमांचे पालन करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले.

विशेषतः अल्पवयीन विद्यार्थ्यांनी वाहन चालवू नये, तसेच पालकांनीही आपल्या मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये, असे आवाहन वाहतूक शाखेच्या अधिकार्यांनी केले. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास स्वतःच्या तसेच इतरांच्या जीवितास धोका निर्माण होऊ शकतो, याबाबत विद्यार्थ्यांना विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजावून सांगण्यात आले.

चंपावती शाळेतील विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हा वाहतूक शाखेकडून राबविण्यात येणार्या अशा जनजागृतीपर उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होत आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राहुल परळकर यांनी केले व आभार प्रदर्शन सौ.नयना कुलकर्णी यांनी मानले.

**वाहतुकीचे नियम ही केवळ पोलिस यंत्रणेचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी**

विद्यार्थ्यांनी वाहतूक नियम स्वतः पाळण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांनाही त्याबाबत जागरूक करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला. रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी केवळ पोलिस यंत्रणेचीच नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक शिस्त आणि रस्ता सुरक्षेची जाणीव निर्माण झाल्यास भविष्यात सुरक्षित वाहतुकीला मोठी मदत होईल तसेच प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा.डॉ.प्रकाश कोंका संचालक रोटरी सेंटर फॉर सेफ्टी अँड ट्राफीक अवारनेस बंकटस्वामी महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रम प्रत्येक शाळेत राबविणार आहोत असेही यावेळी पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर म्हणाले.

# पीएम किसान योजनेचा २४ वा हप्ता ऑक्टोबरमध्ये?




पुणे / प्रतिनिधी

देशभरातील कोट्यवधी शेतकरी पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याची वाट पाहत आहेत. याआधी २० जून २०२६ रोजी २ हजार रुपयांचा २३ वा हप्ता वितरित करण्यात आला होता. कृषी विभागातील काही अधिकाऱ्यांच्या वक्तव्यांच्या आधारावर, २४ वा हप्ता ऑक्टोबरमध्ये मिळणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पण केंद्र सरकारकडून अद्याप अधिकृत तारीख जाहीर करण्यात आलेली नाही.

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्याच्या बँक खात्यांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) द्वारे आतापर्यंत २३ हप्त्यांमधून ४.४७ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारने २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी ३ लाख १५ हजार ६१४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेच्या सुरुवातीपासून महिला शेतकऱ्यांना १.०६ लाख कोटी रुपयांहून अधिक आर्थिक मदत देण्यात आली असल्याचे केंद्र सरकारकडून सांगण्यात आले आहे. पीएम किसान योजनेअंतर्गत वर्षाला ६ हजार रुपयांची मदत देण्यात येत आहे. ही रक्कम प्रत्येकी २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये लाभार्थी शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा केली जाते.

साधारणपणे, सुमारे चार महिन्यांच्या अंतराने २ हजार रुपयांचा हप्ता वितरित केला जातो. पीएम किसान योजनेचा लाभ मिळत राहण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्णकरायला हवी. बँकेशी संबंधित माहितीही बरोबर असायला हवी.

## परराज्यांतून जनावरे घेण्याची अट रद्द



पुणे / प्रतिनिधी

ग्रामीण भागातील पशुपालकांना दुग्ध व्यवसायातून स्वयंरोजगार व उद्योजकतेची संधी उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. आता लाभार्थ्यांना परराज्यांबरोबरच राज्यातील मान्यताप्राप्त ब्रीडर फार्म किंवा राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गत ब्रीड मल्टिप्लिकेशन फार्ममधून दुधाळ जनावरे खरेदी करता येणार आहेत. तसेच लाभार्थी निवडीसाठी 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' हे तत्त्व लागू करण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत दुधाळ गाई-म्हशींचा गट खरेदी करण्यासाठी पूर्वी पात्र लाभार्थ्यांना राज्याबाहेरून जनावरे खरेदी करणे अपेक्षित होते. आता त्यात बदल करून लाभार्थ्याला त्याच्या पसंतीनुसार राज्यातील मान्यताप्राप्त ब्रीडर फार्म, राष्ट्रीय गोकुळ मिशनअंतर्गत ब्रीड मल्टिपिकेशन फार्म किंवा इतर राज्यांतून दुधाळ जनावरे खरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. लाभार्थी निवडीनंतर एका महिन्याच्या कालावधीत स्थापन समितीसोबत जनावरांची खरेदी करणे अपेक्षित आहे.

शेडसाठी तीन लाखांची तरतूद :योजनेतील प्रकल्प खर्चात शेड निर्मितीसाठी तीन लाख रुपयांची तरतूद होती. त्यात बदल करून आता शेड निर्मिती, मुरघास बंकर किंवा शेड व मुरघास बंकर या दोन्हींसाठी मिळून तीन लाख रुपये देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

लाभार्थी निवडीत बदल :जिल्हा वार्षिक योजनेत ऑनलाइन प्राप्त अर्जांची छाननी करून पात्र लाभार्थ्यांची समितीमार्फत सरसकट निवड करण्याची पूर्वीची पद्धत बदलण्यात आली आहे. आता ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यानंतर 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर लाभार्थी निवड केली जाणार आहे.

कर्जफेडीची जबाबदारी लाभार्थ्यावर : उद्योजकता विकास योजनेत घेतलेल्या कर्जाची बँकेने विहित वेळेत परतफेड करणे आवश्यक असल्याची तरतूद होती. त्यात बदल करून आता घेतलेल्या कर्जाची लाभार्थ्याने विहित वेळेत परतफेड करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

## आता कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांची गर्भधारणा



ग्रामीण भागात शेळीपालन हा एक महत्वाचा शेतीपूरक व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील अर्थशास्त्र सुद्धा बऱ्यापैकी या व्यवसायावर अवलंबून आहे. हा व्यवसाय जास्तीत जास्त फायदेशीर कसा करता येईल यासाठी प्रयत्न सुरु असतात. असाच एक शोध म्हणजे कृत्रिम रेतन. आतापर्यंत गायी आणि म्हशींमध्ये कृत्रिम गर्भधारणा याविषयी ऐकले आहे.

कृत्रिम रेतन एक असे तंत्र आहे ज्याद्वारे पशुपालक त्यांच्या गायी आणि म्हशींचा विकास दर, आरोग्य आणि उत्पादकता वाढवून त्यांचे उत्पन्न वाढवू शकतात. परंतु आता शेळ्यांमध्ये सुद्धा कृत्रिम गर्भधारणा करण्याचे प्रयोग केले जात आहे. काही ठिकाणी हे प्रयोग यशस्वी सुद्धा झाले आहेत. कृत्रिम रेतनाद्वारे शेळ्यांच्या जाती सुधारण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जाणून घेऊ याविषयी माहिती.

कृत्रिम रेतन म्हणजे काय?

कृत्रिम रेतन तंत्रज्ञान हे सहाय्यक पुनरुत्पादन तंत्रज्ञान () आहे, ज्याचा उपयोग साठलेले वीर्य थेट प्राण्यांच्या गर्भाशयात जमा करण्यासाठी केला जातो. पशुधनाची कार्यक्षमता आणि अनुवांशिक गुणवत्ता सुधारण्यासाठी ही एक उत्तम प्रजनन पद्धत आहे. याचा फायदा शेळीपालक यांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.

शेळ्यांच्या कृत्रिम रेतनाचा फायदा होईल :एक शेळी सुमारे १४ महिन्यांत ३५ ते ४० किलो वजनाची होते हे. पर्यावरण आणि योग्य आहाराअभावी त्यांचा वाढीचा दर कमी झाला आहे. त्यामुळे आता हा कालावधी वाढून १६ महिन्यांचा झालेला असल्याने पशुपालकांचे मोठे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत पशुपालकांनी वैज्ञानिकांच्या या एआय तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेळ्यांच्या मुलांच्या शारीरिक विकासात वाढ होऊन उत्पादनही चांगले होईल.

## कोंबड्यातील प्राणघातक 'मानमोडी' आजार; वेळीच करा नियंत्रण


कोंबड्यांना होणारा मानमोडी हा संसर्गजन्य आजार असून यामुळे कुक्कुटपालन व्यवसायाचे अर्थशास्त्र कोलमडून पडते. या रोगामध्ये पक्षांच्या मृत्युचे प्रमाण ५० ते १०० टक्के असते. हे नुकसान टाळायचे असल्यास हा रोग होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय करणे गरजेचे असते. यासाठी लसीकरण हा सर्वात चांगला पर्याय आहे.मानमोडी आजाराची कारणे : मानमोडी हा रोग पॅरामिक्सो विषाणूंमुळे होतो. हे विषाणू पक्ष्यांचे श्वसनेंद्रिय, पचनसंस्था, मज्जासंस्था व यकृत यांसारख्या अवयवांवर परिणाम करतात. या रोगाचा प्रसार हवेद्वारे, आजारी पक्ष्यांच्या विष्ठेद्वारा व श्वसनाद्वारे होतो. आजारी पक्ष्यांमुळे पक्षी घरातील वातावरण, उपकरणे व काम करणाऱ्यांच्या कपड्यांवर हे विषाणू मोठ्या प्रमाणात जमा होतात. हे विषाणू वातावरणात बराच वेळ टिकून राहतात. दूषित खाद्य व पाणी, मेलेले पक्षी उघड्यावर टाकणे, लिटर, अंडी उबवणूक यंत्र, इ. पासून या रोगाचा प्रसार होतो. इतर जातींच्या पक्ष्यांना सुद्धा हा रोग होतो व हे पक्षी रोगप्रसारास कारणीभूत ठरतात. मानमोडी आजाराची लक्षणे : या रोगाची लक्षणे, मृत्यूचे प्रमाण, तीव्रता ही विषाणूंचा प्रकार, पक्ष्यांचे वय, लसीकरण, रोगप्रतिकारक शक्ती, साथ, वातावरण व व्यवस्थापन यावर अवलंबून असतात. मोठ्या पक्ष्यांमध्ये अधिकाधिक पक्षी एका रात्रीत आजारी पडतात. पक्ष्यांना पाण्यासारखी हिरवट रंगाची संडास होते, पंख व पाय अधू होतात. मान वाकडी होते. अंडी देण्याचे प्रमाण घटते. कवच मऊ होते व अंड्याचा आकार बदलतो तसेच पांढरा बलक पाण्यासारखा पातळ होतो. श्वास घेताना मोठा आवाज होतो. तोंडाने श्वासोच्छवास करतात. लहान पिलांमध्ये हा तीव्र स्वरुपाचा आजार असून श्वसनाची व मज्जासंस्थेची लक्षणे दिसून येतात, पिल्ले व तलंग सुस्त व अशक्त दिसतात. पक्ष्यांना चालता येत नाही, थरथर कापतात व लंगडतात. डोळा आणि गळ्याला सुज येते.

उपचार : या रोगावर परिणामकारक उपचार उपलब्ध नाहीत; परंतु या रोगानंतर होणाऱ्या जिवाणूजन्य रोगांवर उपचार म्हणून प्रतिजैविकांचा वापर करण्यात येतो. आजारी पक्षी वेगळे काढावे. मृत पक्ष्यांना जाळून टाकावे. दूषित पाणी व खाद्य नष्ट करावे. ऑल इन ऑल आऊट व्यवस्थापन पद्धत राबवावी. शेडचे फ्युमीगेशन (३० मि.लि. फॉर्मेलीन व २० ग्रॅम पोटॅशिअम परमँगनेट) करावे. लसीकरण : पिल्ले आणल्यानंतर सहाव्या दिवशी लासोटा लस डोळ्यांतून एक थेंब द्यावी व त्यानंतर बूस्टर डोस सहाव्या आठवड्यात पाण्यातून देऊन लसीकरण करावे. अंडी देणाऱ्या पक्ष्यांमध्ये दर सहा आठवड्यांनी पाण्यातून लसीकरण करावे. लस सहाव्या आठवड्यात व बूस्टर डोस १५ व्या आठवड्यात इंजेक्शनद्वारे पंखाखाली द्यावी. पक्ष्यांना लसीकरणापूर्वी दोन ते तीन दिवस आधी पाण्यातून जंतनाशक औषध द्यावे.

## कपाशीवरील 'आकस्मिक मर' रोगाचे व्यवस्थापन!

बऱ्याच ठिकाणी कपाशीच्या शेतामधील झाडे अचानक जागेवरच सुकू लागलेली आहेत, यालाच 'आकस्मिक मर' रोग असे म्हणतात. कपाशीच्या आकस्मिक मर रोगामध्ये दीर्घकाळ पाण्याचा ताण पडल्यानंतर जमिनीचे तापमान वाढलेले असते. अशावेळी सिंचन दिल्यास अथवा पाऊस पडल्यास झाडाला धक्का बसून अचानक झाड सुकते आणि कालांतराने झाडाची पाने गळतात. सिंचन दिल्यानंतर किंवा पाऊस पडल्यानंतर ३६-४८ तासात आकस्मिक मर रोगाची लक्षणे दिसू लागतात. सुकल्यानंतर पानगळ होऊन कालांतराने झाडे मरतात त्यामुळे उत्पादनात मोठे नुकसान होऊ शकते. असे करा नियंत्रण :जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा लवकरात लवकर निचरा करावा. वापसा येताच कोळपणी व खुरपणी करावी. लवकरात लवकर २०० ग्रॅम युरिया + १०० ग्रॅम पांढरा पोटॅश (००:००:५० खत) + २५ ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड प्रति १० लिटर पाण्यात मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली याप्रमाणे आळवणी करावी. किंवा १ किलो १३:००:४५ + २ ग्रॅम कोबाल्ट क्लोराईड + २५० ग्रॅम कॉपर ऑक्सीक्लोराईड २०० लिटर पाण्यातून मिसळून तयार द्रावणाची प्रति झाड १०० मिली आळवणी करावी. द्रावणाची आळवणी केल्यानंतर सुकू लागलेल्या झाडाजवळची माती पायाने लवकरात लवकर दाबून घ्यावी. वरील सर्व उपाय योजना शेतामध्ये झाडे सुकू लागलेली दिसताच लवकरात लवकर म्हणजे २४ ते ४८ तासाच्या आत कराव्या जेणेकरून पुढे होणारे मोठे नुकसान वेळीच टाळता येईल.

# उत्कृष्ट कोंबडी खत; जाणून घ्या फायदे आणि वापर पद्धती!



जमिनीची कमी होत जाणारी सुपीकता आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण यामुळे जास्तीत जास्त शेतकरी शेतात सेंद्रिय खतांचा वापर करण्याकडे भर देत आहेत. सेंद्रिय खताचे वेगवेगळे प्रकार शेतकर्यांना माहित आहेत. त्यामध्ये कोंबडी खत हा एक सहज उपलब्ध होणारा आणि चांगला पर्याय आहे. कोंबड्यांची विष्ठा, कोंबड्यांच्या लिटरसाठी वापरलेला लाकडाचा भुस्सा, साळीचा भुस्सा, शेंगाची टरफले इ. सर्व घटक कुजल्यानंतर तयार झालेला पदार्थ म्हणजे 'कोंबडी खत'.

कोंबडी खताचे फायदे :कोंबडी खत वापरल्याने मातीची भौतिक, रासायनिक व जैविक क्षमता सुधारते. बागायती पिके जसे ऊस, फळपिके आणि फुलझाडे कोंबडी खतास चांगला प्रतिसाद देतात. कोंबडी खतामध्ये मुख्यत: १३ अन्नद्रव्ये असतात. त्यात नत्र व स्फुरद जास्त प्रमाणात असते. कोंबडी खतातील नत्र हे अमोनिया, नायट्रेट, युरिक ॲसिड या प्रकारांत आढळते.

मुख्य अन्नद्रव्यांव्यतिरिक्त कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, सल्फर, सोडिअम, फेरस, मंगल, मॉलिब्डेनम, बोरॉन, झिंक, कॉपर इत्यादी अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. शेणखतासारखा कोंबडी खतामुळे तणांचा प्रादुर्भाव होत नाही.

कोंबडी खताचा शेतात वापर :मशागतीच्या वेळी पेरणीपूर्वी एक ते दीड महिना अगोदर कोंबडी खत जमिनीत मिसळावे. यानंतर कुळवाची पाळी द्यावी; मात्र ताजे कोंबडीखत उभ्या पिकांत जमिनीत मिसळू नये. उभ्या पिकांत कोंबडीखत जमिनीत मिसळण्यापूर्वी प्रथम त्यावर एक महिना पाणी मारून रापून किंवा थंड होऊ द्यावे म्हणजे कोंबडी खताचे कर्ब : नत्र गुणोत्तर कमी होऊन त्यातील अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होतात. कोंबड्यांच्या शेडमध्ये कोंबड्यांची विष्ठा, मूत्र, गव्हांडा किंवा भाताच्या तुसावर पडून खत तयार होते, त्यामुळे ताज्या कोंबडी खताचे कर्ब नत्र गुणोत्तर जास्त असते. असे खत उभ्या पिकांत जमिनीत मिसळताना ओलावा असणे गरजेचे आहे. जमिनीत पुरेसा ओलावा नसेल तर पीक पिवळे पडते, त्यामुळे ताजे कोंबडीखत थेट पिकांसाठी वापरू नये. उभ्या पिकांत पूर्ण कुजलेले कोंबडीखत वापरावे.

कोंबडी खत कसे असावे? खताचा रंग भुरकट, तपकिरी, काळपट असावा. वास मातकट असावा. खताचा सामू ६.५- ७.५ दरम्यान असावा. कोंबडी खताच्या कणांचा आकार ५ ते १० मिमी असावा. कर्ब नत्र गुणोत्तर १:१० ते १:२० दरम्यान असावे. कोंबडी खताची जलधारणाशक्ती ३० टक्क्यांपेक्षा जास्त असावी.




### जागतिक दिवस
### भारतीय संस्कृत दिन
### शिक्षक दिन भारत

### महत्वाच्या घटना

१९३२ : फ्रेन्च अपर व्होल्टा या प्रांताचे विभाजन करुन आयव्हरी कोस्ट, फ्रेन्च सुदान आणि नायगर असे देश निर्माण करण्यात आले.

१९४१ : इस्टोनिया हा प्रांत नाझी जर्मनीने ताब्यात घेतला.

१९६७ : ह. वि. पाटसकर पुणे विद्यापीठाचे सातवे कुलगुरू झाले.

१९७७ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने बाह्य सौरमालेचा अभ्यास करण्यासाठी व्हॉएजर १ या उपग्रहाचे पृथ्वीवरून उड्डाण केले

१९८४ : एसटीएस -४१-डी ही नासाच्या स्पेस शटल प्रोग्रामची १२ वी फ्लाइट आणि स्पेस शटल डिस्कवरीचे पहिले मिशन होते. हे डिस्कव्हरी यान आपली पहिली अंतराळ यात्रा पूर्ण करून कॅलिफोर्नियामधील एडवर्ड्स एअर फोर्स बेस येथे दाखल झाले.

२००० : ज्येष्ठ दिग्दर्शक हृषीकेश मुकर्जी यांना 'दादासाहेब फाळके' पुरस्कार जाहीर

२००५ : इंडोनेशियातील सुमात्रा येथे मंडाला एअरलाइन्सचे 'फ्लाईट ०९१' हे उड्डाण दाट लोकवस्तीच्या भागात कोसळुन विमानातील १०४ आणि जमिनीवरील ३९ लोक ठार झाले.

२०१२ : स्पेनमध्ये टेलिव्हिजनवर बंदी घालण्यात आलेल्या थेट बुलफाईटिंगच्या प्रसारणावर सहा वर्षाची बंदी उठवण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११८७ : लुई (आठवा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: ८ नोव्हेंबर १२२६)

१६३८ : लुई (चौदावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: १ सप्टेंबर १७१५)

१८७२ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी आणि तामिळनाडू राज्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेता व लोकमान्य टिळक यांचे शिष्य वी. ओ. चिदंबरम पिल्लै यांचा जन्मदिन.

१८८८ : डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती, पहिले उपराष्ट्रपती आणि तत्त्वज्ञ, त्यांच्या गौरवार्थ त्यांचा जन्मदिन हा भारतात 'शिक्षक दिन' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: १७ एप्रिल १९७५)

१८९५ : अनंत काकबा प्रियोळकर भाषा व इतिहास संशोधक, लेखक, संपादक व समीक्षक. त्यांनी संपादित केलेल्या विविध ग्रंथात रघुनाथपंडित कृत 'दमयंती स्वयंवर' व मुक्तेश्वरकृत 'महाभारताचे आदिपर्व' हे उल्लेखनीय आहेत. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)

१९०५ : प्रसिद्ध भारतीय उपन्यासकार, कथाकार व संपादक वाचस्पती पाठक यांचा जन्मदिन.

१९०७ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (मृत्यू: ३० ऑगस्ट १९८१)

१९२० : लीला पोतदार तथा लीलावती भागवत बालसाहित्यिका. ओघवती भाषा, चित्रमय वर्णन व बोलकी संवादशैली ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या 'स्वर्गाची सहल आणि इतर कहाण्या' या पुस्तकाचा 'नॅशनल बुक ट्रस्ट'ने ११ भाषांत अनुवाद प्रसिद्ध केला. (मृत्यू: २५ नोव्हेंबर २०१३)

१९२८ : दमयंती जोशी सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना (मृत्यू: १९ सप्टेंबर २००४)

१९३३ : आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'रॅमन मॅग्सेसे पुरस्कार' ने सन्मानित करण्यात आलेले भारतीय नौदलाचे माजी सेवानिवृत्त प्रमुख अधिकारी व लोकपाल लक्ष्मीनारायण रामदास यांचा जन्मदिन.

१९४० : रॅक्वेल वेल्श अमेरिकन अभिनेत्री

१९५४ : वेस्ट इंडिजचा क्रिकेट खेळाडू रिचर्ड ऑस्टिन यांचा जन्म.

१९४६ : मूळ भारतीय वंशाचा ब्रिटीश गायक व संगीतकार फ्रेडी मर्क्युरी यांचा जन्म.

१९८६ : भारतीय क्रिकेटपटू प्रज्ञान ओझा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०६ : लुडविग बोल्टझमन ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २० फेब्रुवारी १८४४)

१९१८ : सर रतनजी जमसेटजी टाटा टाटा घराण्यातील उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म: २० जानेवारी १८७१)

१९७८ : रघुनाथ रामचंद्र तथा रॉय किणीकर कवी, संवादलेखक, नाटककार व पत्रकार. 'रात्र' आणि 'उत्तररात्र' हे त्यांचे कवितासंग्रह विशेष गाजले. मुंबई आकाशवाणीवरील 'वार्यावरची वरात' व 'मेघदूत' या श्राव्य नियतकालिकांचे ते निर्माते व लेखक होते. (जन्म: ? ? १९०८)

१९८६ : अशोक चक्र पुरस्कार सन्मानित भारतीय महान वैमानिक नीरजा भनोट यांचे निधन.

१९८६ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शिक्षणतज्ज्ञ व हिंदी साहित्यिक अंबिका प्रसाद दिव्य यांचे निधन.

१९९१ : शरद जोशी पद्मश्री पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय हिंदी कवी, लेखक, व्यंगचित्रकार आणि हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिका संवाद आणि पटकथा लेखक (जन्म: २१ मे १९३१)

१९९२ : अतूर संगतानी उद्योगपती व दानशूर व्यक्ति (जन्म:)

१९९५ : सलील चौधरी हिंदी व बंगाली चित्रपटसृष्टीतील संगीतकार (जन्म: १९ नोव्हेंबर १९२२ चिंगरीपोथा, २४ परगणा, पश्चिम बंगाल)

१९९६ : भारतीय बिशप बॅसिल सालदवदोर डिसोझा यांचे निधन. (जन्म: २३ मे १९२६)

१९९७ : मदर तेरेसा शांततेचा नोबल पारितोषिक आणि भारतातील सर्वोच्च नागरिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध समाजसेविका, व कॅथोलिक चर्चच्या धर्मगुरू (जन्म: २६ ऑगस्ट १९१०)

२००० : रॉय फ्रेड्रिक्स वेस्ट इंडिजचा क्रिकेटपटू (जन्म: ११ नोव्हेंबर १९४२)

२०१५ : भारतीय गायक-गीतकार आदेश श्रीवास्तव यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर २०१५)

# जमीनीबाबत न्यायालयासमोर ब फायनल अहवाल दाखल!

## सर्वोच्च न्यायालयाचा आदेशः सदरील जमीन संध्या डागा यांची असल्याचे पोलीस तपासातही सिद्ध!

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील सर्वे नंबर ५५४ मधील जमिनी संबंधात न्यायालयाच्या आदेशानुसार संध्या राजेंद्र डागा व इतरांविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात पोलिसांनी चौकशी अंती सदरील जमिनी बाबत कसलाही गैरप्रकार आढळून आला नाही. दिवाणी वरिष्ठ स्तर न्यायालय, जिल्हा न्यायालय ,उच्च न्यायालय, आणि सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल पत्रानुसार सदर जमीन ही संध्या डागा यांचीच असल्याचे सिद्ध झाले असून तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयासमोर ''ब फायनल'' अहवाल दाखल केला आहे. शुक्रवारी ( ता.०४) संध्या डागा,अॅड. दीपक काकडे, यांनी पत्रकार परिषद घेऊन जमिनीबाबत निर्माण केल्या जात असलेल्या संभ्रमाचा



भांडाफोड करत प्रसारमाध्यमांसमोर वस्तुस्थिती विषद केली. यावेळी राजेंद्र डागा, आशीष छाजेड, सचिन अग्रवाल, वामन खेडेकर यांची उपस्थिती होती.

मंठा रोडवरील सर्वे नंबर ५५४ मध्ये आबड कुटुंबीयांच्या मालकीची असलेल्या जमिनीपैकी काही जमीन सुरजाबाई आबड यांनी आपली मुलगी संध्या डागा यांना सन २००७ साली दिली होती. सदर मालमत्ते संबंधात अंकित आबड आणि त्यांच्या कुटुंबीयांनी या पुर्वी दाखल केलेले दावे सर्वच न्यायालयात फेटाळण्यात आले आहेत. तथापि अंकित आबड यांनी भूखंडाची विक्री होऊ न देण्यासाठी सदर जागेबाबत जनतेमध्ये गैरसमज निर्माण व्हावा यासाठी ताब्यामध्ये अडथळा आणणे, दिवाणी व महसुली न्यायालयीन कार्यवाही मध्ये विचार झालेल्या वादाला फौजदारी स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. कलम १५६ ( ०३) अंतर्गत कदीम जालना पोलीस ठाण्यात संध्या डागा ,त्यांचे पती व इतरांविरुद्ध दाखल केलेल्या गुन्ह्यात फसवणूक, बनावट दस्तऐवज तयार करणे, आणि कट रचणे असे आरोप केले होते. आपण तपास यंत्रणेला पूर्ण सहकार्य केले असून बजावलेल्या नोटीसीनुसार पोलीस ठाण्यात उपस्थित राहून लेखी म्हणणे व जबाब नोंदविला, संबंधित न्यायालयीन निर्णय, आदेश तसेच शासकीय व अधिकृत अभिलेख तपास अधिकाऱ्यांसमोर सादर केल्याचे सांगितले. पोलिसांनी तपासा अंती गुन्हा घडलाच नाही, खोटी तक्रार दाखल करून न्यायालय ,पोलीस प्रशासन आणि शासकीय यंत्रणेचा वेळ व शक्ती विनाकारण खर्ची घालण्यात आल्याचे तपास अधिकाऱ्यांनी नमूद केल्याचे अॅड.दीपक काकडे यांनी सांगितले. आपल्याला पूर्वीपासून जमीन नको होती मात्र आईच्या भावना, आग्रह लक्षात घेऊन आपण जमीन घेतली.आपण आपल्या वाट्याची जमीन भावांमध्ये वाटून देण्यास तयार होतो.तथापि खोट्या आरोपांमुळे मला आणि माझ्या कुटुंबाला प्रचंड मानसिक त्रास, सामाजिक अपमान व नाहक बदनामी सहन करावी लागली.'' ब फायनल'' अहवाल दाखल झाल्यामुळे सत्य समोर आले आहे. ''दोन्ही परिवारांनी एकत्र यावे. बहीण - भावाचे नातेसंबंध, प्रेम पूर्वीप्रमाणेच मधुर व्हावेत अशी आपली इच्छा आहे.

## || थोडक्यात



### परिसंवाद समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल कैलास राठी यांचा सत्कार

अंबड। प्रतिनिधी

शहराच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी अंबड नगर परिषदेतर्फे 'शहर विकास विषयक परिसंवाद समिती' स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या सदस्यपदी तथा प्रांताध्यक्ष मारवाडी युवा मंचचे कैलास राठी यांची नियुक्ती करण्यात आल्यामुळे धाईतनगर येथे सत्कार करण्यात आला या सत्काराचे आयोजन धाईतनगर मित्रमंडळा तर्फे करण्यात आले होते, मान्यवरानी मनोगत व्यक्त करून कार्यक्रम उत्साहात सम्पन्न झाला.यावेळी सेवानिवृत्त मंडळाधिकारी शिवाजीराव गाडेकर,प्रा केशव अटकर,प्रल्हादशेठ उगले, प्रवीणशेठ उदावन्त, प्रा धोंडोपंत कुरळीकर,नामदेवराव पवार,प्रा रेडे, मनोहर धाईत, रामभाऊ वाबळे, दत्ता कायंदे, संदीप सपकाळ, प्रा काटकर, प्रा बांगर,कारभारी गावडे, सतीश भाडमुखे, डॉ प्रकाश खरात व अन्य नागरिक उपस्थित होते.

### तीन महिन्यांचे धान्य एकत्र वाटप

जालना : आगामी पावसाळा व त्यानंतरच्या संभाव्य नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर राज्यातील लाभार्थ्यांना धान्याचा सुरळीत पुरवठा व्हावा, यासाठी केंद्र शासनाने राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीतील अन्नधान्य आगाऊ उचल करून लाभार्थ्यांना ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भातील केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार राज्यात कार्यवाही सुरू आहे. मात्र, विविध घटकांतील कार्यात्मक विलंबामुळे राज्यात तीन महिन्यांचे अन्नधान्य ई-पॉस मशीनद्वारे लाभार्थ्यांना एकत्रित वाटप करताना अडचणी निर्माण होत असल्याचे यापूर्वी निदर्शनास आले होते. त्यामुळे माहे ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील अन्नधान्याचे एकत्रित वाटप न करता, दरमहा स्वतंत्रपणे वितरणास मान्यता देण्याची विनंती केंद्र शासनाकडे करण्यात आली होती. या विनंतीची दखल घेत केंद्र शासनाने २२ जुलै २०२६ रोजीच्या पत्राद्वारे संबंधित कालावधीत अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी आवश्यक त्या मुदतीत दरमहा अन्नधान्य वितरणास मान्यता दिली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करताना ई-पॉस प्रणालीतील अडचणी टाळण्यास मदत होणार आहे.केंद्र शासनाच्या निर्देशांनुसार जिल्ह्यातील संपूर्ण अन्नधान्य महिनानिहाय गोदामांमध्ये पोहोचवून, तेथून थेट वाहतूक करून रास्तभाव दुकानांमध्ये वितरित करण्यात आल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

### खाद्यतेल विक्रीला एक वर्षाची मुदतवाढ

जालना : राज्यात खुल्या (सुट्या) खाद्यतेल विक्रीवर अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी घातलेल्या बंदीला राज्य शासनाने तात्पुरती स्थगिती देत एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे. या निर्णयामुळे व्यापारी वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून जालना जिल्हा व्यापारी महासंघ आणि 'कॅट'च्या वतीने या निर्णयाचे फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोषात स्वागत करण्यात आले.अन्न व औषध प्रशासनाने अचानक सुट्या खाद्यतेलाच्या विक्रीवर बंदी घातल्याने किरणा व तेल विक्रेत्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले होते. या निर्णयाविरोधात जालना जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा 'कॅट'चे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी पुढाकार घेतला. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेलद्वारे निवेदन पाठवून व्यापाऱ्यांच्या अडचणी मांडल्या आणि या बंदीला मुदतवाढ देण्याची मागणी केली. राज्यभरातील व्यापारी संघटनांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला.व्यापाऱ्यांच्या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खुल्या खाद्यतेलाच्या विक्रीला एक वर्षाची मुदतवाढ जाहीर केली. या निर्णयाची माहिती मिळताच जालन्यातील होलसेल किराणा मार्केटमध्ये व्यापारी एकत्र आले. 'व्यापारी एकता जिंदाबाद'च्या घोषणा देत आणि फटाके फोडून व्यापाऱ्यांनी शासनाच्या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला आणि यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल सतीश पंच यांना पेढा भरवून त्यांचा सत्कार केला. यावेळी ऑइल मिल असोसिएशनचे अध्यक्ष संजय शिनगारे, कपिल चावला, संजय राऊत, रवींद्र अग्रवाल, गोविंदा सांखला, गोपाल काबरा, सत्यनारायण काबरा, निलेश नवपुते, रितेश तोष्णीवाल, चेतन रुणवाल, मनोज गडगिळे, अभिजीत मालपाणी, सचिन पंच, आनंद पंच, गोपाल झंवर यांच्यासह मोठ्या संख्येने स्थानिक व्यापारी आणि महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/६०७
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०२/०९/२०२६

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) रुबीना अफसर हास्मी सिटी सर्व्हे नं. १३४१ नं.प.घर. न.१२-६५/३ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१२-६५/३) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/ जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- आशियबी शेख सईद यांचे घर
पश्चिम : ५ फुट रुंदीचा सामाईक रस्ता
दक्षिण- फेरोजखॉ अहेमदखॉ यांचे घर
उत्तरः नजमाबी शेख शहमहमद यांचे घर

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## पाथर्डी दुष्काळग्रस्त जाहीर करून हेक्टरी ५० हजार व पशुसाठी चारा छावण्या सुरू करण्याची मनसे मागणी !

पाथर्डी । प्रतिनिधी

यावर्षी संपूर्ण महाराष्ट्रात पावसाने पाठ फिरवली असून दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने पाथर्डी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील झालेल्या पिकांचे नुकसानी पोटी सरसकट हेक्टरी पन्नास हजार मदत जाहीर करून पाथर्डी तालुक्यात पाण्याचे टँकर आणि जनावरांसाठी चारा छावण्या सुरू करा अशी मागणी तहसीलदार उद्धव नाईक यांच्याकडे मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे यांनी केली आहे मनसेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात पालवे यांनी म्हटले आहे की पाथर्डी तालुक्यात यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्याने आज दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

तालुक्यातील सर्व तलाव विहिरी कोरड्या पडल्या असून पाण्यावाचून माणसांचे व चाऱ्यावाचून जनावरांचे प्रचंड हाल होत आहेत अशा परिस्थितीत मागेल तिथे टँकर देणे व प्रस्ताव आल्यावर विलंब न लावता तात्काळ मंजुरी देऊन टँकर सुरू होणे तसेच जनावरांना चाऱ्यासाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे तरी आपण आपल्या यंत्रणेमार्फत तालुक्यात जिथे गरज आहे तिथे तात्काळ चारा छावण्या सुरू कराव्यात व त्यासाठी तातडीने कार्यवाही सुरू करण्यात यावी कारण आज परिस्थिती आहे त्यापेक्षा बिकट परिस्थिती येत्या १५ ते २० दिवसानंतर होणार आहे त्यासाठी आपण दुष्काळ व टंचाई निर्माण झाल्याने दुष्काळाशी सामना करण्याची तयारी करणे गरजेचे आहे तरी आपण शेतकऱ्यांचे पशुधन वाचवण्यासाठी मागण्यांचा सकारात्मक विचार करून तालुक्यात चारा छावण्या सुरू करण्यासाठी कार्यवाही कराल अशी अपेक्षा शासन व प्रशासनाकडे मनसे पदाधिकाऱ्यांनी केली आहे यावेळी उपजिल्हाध्यक्ष देविदास हंडाळ तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ अक्षय उराडे संतोष पवार सरपंच अशोक गाडे सरपंच दादासाहेब शेंबडे नवनाथ वाघ ग्रा.पं.सदस्य परमेश्वर तिरखुंडे बबन शिंदे सुभाष शिंदे राजेंद्र खेडकर यांसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

## दुष्काळी सदृश परिस्थितीमुळे शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव यंदा स्थगित

जालना। प्रतिनिधी

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने दरवर्षी उत्साहात आयोजित करण्यात येणारा शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव यंदा दुष्काळ सदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर स्थगित करण्यात आला आहे. शिवचैतन्य प्रतिष्ठान, जालना यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या दहीहंडी महोत्सवाची जालना शहरासह संपूर्ण जिल्ह्यात मोठी उत्सुकता असते. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने चंद्रशेखर आझाद मैदान, जालना येथे भव्य स्वरूपात शिवचैतन्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. जालना शहरातील मानाच्या दहीहंडींमध्ये या दहीहंडीचा विशेष नावलौकिक असून, यंदाचे हे पाचवे वर्ष आहे. मात्र, सध्या निर्माण झालेल्या दुष्काळ सदृश परिस्थितीचा विचार करून यंदाचा कार्यक्रम आयोजित न करण्याचा निर्णय शिवचैतन्य प्रतिष्ठानच्या वतीने घेण्यात आला आहे.

दरवर्षी या महोत्सवात दहीहंडी स्पर्धेसोबतच ढोल पथकांच्या स्पर्धेचेही आयोजन करण्यात येते या महोत्सवात मुंबई, ठाणे सह महाराष्ट्रातील विविध शहरातून गोविंदा पथके सहभागी होत असतात. त्यामुळे या दहीहंडी महोत्सवाला जालना शहरात मोठी गर्दी होत असते. सध्याची दुष्काळ सदृश परिस्थिती आणि त्यातून निर्माण झालेले संकट इत्यादी अडचण लक्षात घेता शिवचैतन्य प्रतिष्ठानने यंदाचा शिवचैतन्य दहीहंडी महोत्सव रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे यावर्षी चा दहीहंडी कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. सदरील दहीहंडी उत्सव रद्द करण्यात आल्याची सर्व कृष्णभक्त, गोविंदा पथके, दहीहंडीप्रेमी तसेच प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी याची नोंद घ्यावी असे आवाहन शिवचैतन्य प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात येत आहे.

## भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी म्हणून सर्वांना न्याय देण्याचे काम करणाऱ्या संवेदनशील जिल्हाधिकारी अशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी हे गांव राजकारण आणि सामाजिक आंदोलनाचे मुख्य केंद्र बनला आहे. अंतरवाली सराटीत मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील आणि भारतीय प्रशासकीय अधिकारी जालना जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्यात मसुद्यावर महत्त्वाची चर्चा झाली. श्री. जरांगे यांची प्रकृती खालावल्याने जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी पोलीस अधिक्षकांसह अंतरवाली सराटी गाठली. त्यांनी शासनाचे प्रतिनिधी म्हणून श्री. जरांगे यांना उपोषण सोडण्याचे व वैद्यकीय उपचार घेण्याचे भावनिक आवाहन केले. चर्चेदरम्यान श्री. जरांगे यांनी शासनावर आणि परिस्थितीवर रोखठोक भाष्य करीत सगळ्यावर फाशी घेण्याची वेळ आली आहे, असे सांगताच कर्तव्य बजावतांना फाशी घेण्याची वेळ आली तरी माझी तयारी आहे, मात्र, तुम्ही उपोषण सोडून प्रकृतीकडे ध्यान द्या, कारण तुमची मराठा समाजाला आणि पर्यायाने शासनाला गरज आहे, असे भावनिक आवाहन भारतीय प्रशासकीय जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी केले. जिल्हाधिकाऱ्यांचे हे बोलणे ऐकुन मनोज जरांगे पाटील यांनी त्यांना थांबवले आणि 'तुम्ही जिल्हाधिकारी आहात, अशी फाशीची भाषा बोलू नका, कशाला या भानगडीत पडता, असा सल्ला दिला. एका प्रश्नावरून आपल्यावर टीका झाली तरी त्यासाठी अशा प्रकारची भाषा करण्याची गरज नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी अशीमा मित्तल यांच्या शिक्षणाचा आणि प्रशासकीय कारकीर्दीचा उल्लेख करत त्यांना अशा वक्तव्यांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला.



एकीकडे तुम्ही रात्रंदिवस अभ्यास करुन या पदापर्यंत पोहोचला आहात तर दुसरीकडे सत्तेत बसलेले चौथी पास तुम्हाला पुढे करून मोकळे झालेत, असे म्हणत मनोज जरांगे यांनी अशीमा मित्तल यांचा सन्मान श्रीमती अशिमा मित्तल ह्या राजस्थानातील जयपूर येथील असल्याचेही स्पष्ट केले. एकीकडे जिल्हा प्रशासन आणि सर्वसामान्य जनतेतील वाढता दुरावा तर दुसरीकडे जालना जिल्हाधिकारी अशीमा मित्तल यांनी दाखवलेल्या संयमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

श्रीमती अशिमा मित्तल ह्या राजस्थानातील जयपूर येथील मध्यमवर्गीय व्यावसायिक कुटुंबात जन्मल्या. त्यांच्या वडिलांचा स्वतःचा व्यवसाय असून, घरातील संस्कार आणि अभ्यासाच्या वातावरणामुळे आयआयटीच्या प्रवेश परीक्षेत यश मिळविले. त्यानंतर मुंबई येथील आयआयटीमधून सिव्हिल इंजिनिअर ही पदवी मिळवली. पदवीनंतर मोठ्या हुद्द्यावरच्या नोकरीचे प्रस्ताव त्यांच्यापुढे होते. परंतु, तळागाळातील सर्वसामान्य लोकांच्या अडी-अडचणी सोडवण्याची जबाबदारी घेत त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली. या परीक्षेत त्यांनी देशभरातून बाराव्या रँकने उत्तीर्ण होण्याचा बहुमान मिळविला. पुढे सन २०१८ साली त्यांनी प्रशासकीय अधिकारी म्हणून महाराष्ट्रात आपल्या कामाची सुरुवात केली. महाराष्ट्रात रुजू झाल्यानंतर त्यांनी मराठी भाषेवर प्रभुत्व मिळविले. अहिल्यानगर येथे म्हणून त्यांनी आपल्या कामाची छाप सोडली. त्यानंतर नाशिक, चंद्रपूर व नागपूर येथे उपविभागीय अधिकारी, प्रकल्प अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिले. विशेष म्हणजे चंद्रपूर येथे कार्यरत असताना तेथील औद्योगिक, शेतकरी आणि खाण कामगारांच्या प्रश्नांना तडीस नेले. नाशिक येथे प्रकल्प अधिकारी म्हणून कार्यरत असताना आदिवासी भागातील बरेचशे प्रश्न मार्गी लावले. नाशिक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासाकरिता काम केले. विशेष म्हणजे ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी त्यांनी सुपर ५० सारखे उल्लेखनीय उपक्रम राबविले. नाशिक येथील भरीव कामगिरीची दखल घेत राज्य शासनाने दि. १ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांना जालना जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त केले. मराठवाड्यातील दुष्काळी भाग, पिण्याच्या पाण्याची समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या, औद्योगिक वसाहतीतील प्रश्न आणि प्रामुख्याने मराठा आरक्षणाचे आंदोलन म्हणून जालना संपूर्ण महाराष्ट्रात ओळखला जातो. जालन्यात रुजू झाल्यापासून त्यांनी प्रशासकीय यंत्रणेवर आपली पकड मजबूत केली. महसूल व इतर मुख्य विभागात पारदर्शकात आणणे, पीक विमा, नैसर्गिक आपत्ती व इतर महत्वाच्या विषयांवर अधिक सखोलपणे अभ्यास करण्यावर त्यांनी भर दिला होता. प्रशासकीय संयम, नम्रता, कायदेशीर शिस्त आणि संवेदनशीलता दाखवणाऱ्या अशीमा मित्तल यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे

## भगवानगडाच्या पायथ्याशी चमत्कार का साक्षात्कार!

### सगळ्या विहिरी कोरड्याठाक पण ''ती'' विहीर काठोकाठ भरलीली पाहून सर्वच चक्रावले !




पाथर्डी । प्रतिनिधी

नदी नाले ओढे कोरडे ठाक पडले आहेत पाण्याचा कुठे थेंब सुद्धा नाही अशातच भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या डोंगरातील विहिरीला अचानक आलेलं पाणी आणि तुडुंब पाण्याने भरलेली विहीर हा चर्चेचा विषय बनला आहे भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या बीड जिल्ह्यातील घोगस पारगाव शिवारात असलेली भगवानबाबांच्या काळातील विहीर अचानक पाण्याने तुडुंब भरली आहे दुष्काळी बीड जिल्ह्यात निसर्गाचा अनोखा चमत्कार समोर आला आहे मात्र या विहिरीलाच पाणी आले कसे ? निसर्गाचा चमत्कार की भगवानबाबांचा साक्षात्कार अशी चर्चा या परिसरात रंगली आहे विशेष म्हणजे भगवानगडावर या अगोदर पाणीटंचाई होती भगवानगडावरील माऊली मंदिराच्या बांधकामासाठी देखील पाणी कमी पडत होते या विहिरीला पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली आहे बीड आणि अहिल्यानगर जिल्ह्यात पावसाने यावर्षी दडी मारल्याने सर्वत्र पाण्याची टंचाई आहे सर्वत्र नदी नाले ओढे कोरडे ठाक पडले आहेत अशातच भगवानगडाच्या पायथ्याशी असल्या डोंगरातील विहिरीला आलेला पाणी हा चर्चेचा विषय बनला आहे विशेष म्हणजे या विहिरीला एक सप्टेंबर रोजी तुडुंब पाण्याने भरली त्यादिवशी संत भगवानबाबा यांचा जयंती सोहळा गडावर साजरा केला जात होता यासंदर्भात भूगर्भ शास्त्रज्ञांनी नेमकं काय झालं होतं आणि पाणी का आले या संदर्भात भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे.

## जायकवाडीच्या पाण्यासाठी शिष्टमंडळाची नाशिक कार्यालयास भेट

### शेतीला हक्काचे पाणी द्या, नदीजोड गतीने करा

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वंचित भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे व कृष्णा खोऱ्यातील हक्काचे पाणी मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनातील समन्वयकांनी नाशिक येथे जाऊन नदीजोड कार्यालयातील कार्यकारी अभियंता यांची भेट घेतली. बीड जिल्ह्यातील वंचित भागातील शेतीला जायकवाडी धरण व कृष्णा खोऱ्यातील हक्काचे पाणी द्यावे, नदीजोड प्रकल्प गतीने करावा अशी मागणी केली.

बीड जिल्ह्यात दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळ पडतो. यामुळे शेती सातत्याने तोट्यात जात आहे. यातुनच शेतकरी आत्महत्या, रोजगारासाठी तरुणांचे स्थलांतर, ऊसतोड मजूर, महिलांचे आरोग्य असे एकना अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दुष्काळाने बहुतांश शेती सातत्याने तोट्यात जात असल्याने




शिरुर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव तालुक्यातील १४० पेक्षा अधिक गावातील शेतकर्यांनी एकत्र येत लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनच्या माध्यमातून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री, खासदार, आमदार या लोकप्रतिनिधींची व वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांची भेट घेऊन व वेळप्रसंगी उपोषण, बैलगाडी मोर्चा काढून शेतीला हक्काचे पाणी देण्याची मागणी केली आहे. शेतीला हक्काचे पाणी मिळावे यासाठी शासन नदीजोड प्रकल्प करीत असले तरी त्याला गती नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत.

या पार्श्वभूमीवर लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे, संतोष भारती, राहुल लोंढे, अप्पासाहेब महानोर यांच्या शिष्टमंडळाने नाशिक येथील सिंचन भवन येथे जाऊन नदीजोड प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मराठवाड्यातील दुष्काळी भागातील शेतीला शंभर पेक्षा अधिक टीएमसी पाणी दिले जावे यासाठी शासन योजना करीत आहे, मात्र या कामास गती देऊन बीड जिल्ह्यात तातडीने पाणी उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी केली. गोदावरी भरुन वाहत असली तरी गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प नसल्याने हे पाणी श्री क्षेत्र भगवान गड ते माजलगाव पर्यंतच्या वंचित भागातील शेतीला मिळत नाही, नदीजोड प्रकल्प गतीने केला तर वंचित भागातील शेतीलाही पाणी मिळेल व पिके वाया जाणार नाहीत, ही बाब कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. यासह नदीजोड प्रकल्पातून बीड जिल्ह्यातील शेतीला हक्काचे पाणी किती देणार ही मागणीही करण्यात आली. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून शासन राबवणार असलेल्या उपाययोजनांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. मराठवाड्यासाठी होत असलेल्या नदीजोड प्रकल्पात बीड जिल्ह्यात प्रथम कामे करावीत व नियोजित कालावधी ठरवून कामे करावित अशी मागणीही यावेळी लोकलढा आंदोलनाच्या समन्वयकांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे केली.

# जय महेश कारखान्यामध्ये ड्रायर मधून पोटॅशची निर्मिती

## यंदा दोन ते तीन हजार मेट्रिक टन उत्पादनाचे उद्दिष्ट – नारायण मूर्ती

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पवारवाडी येथील खासगी तत्त्वावरील जय महेश साखर कारखान्यामध्ये निर्माण होणाऱ्या उपपदार्थाचा उपयोग करून ड्रायर मधून पोटॅश निर्मितीचा उपक्रम सुरू केला आहे. मागील गळीत हंगामाच्या अखेरीस या उपक्रमातून सुमारे २०० टन पोटॅशची निर्मिती करण्यात आली होती. यंदाच्या हंगामात नवीन अत्याधुनिक बॉयलर बसऊन जास्त उत्पादन वाढवून तब्बल दोन ते तीन हजार मेट्रिक टन पोटॅश निर्मिती करण्याचे उद्दिष्ट कारखाना प्रशासनाने ठेवले असल्याची माहिती कारखाना उपाध्यक्ष नारायण मूर्ती यांनी दिली आहे.

निपाणी टाकळी येथे मागील वर्षी ड्रायर ची उत्पादन क्षमता वाढवण्यात आली होती. त्यातून उपलब्ध होणाऱ्या पदार्थावर प्रक्रिया करून पोटॅश तयार करण्यात येत आहे. या पोटॅशची परिसरातील शेतकऱ्यांना अल्प दरात विक्री करण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होणार आहे. रासायनिक खतांच्या वाढत्या किमतीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या या खतामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चातही बचत होण्याची अपेक्षा आहे. जय महेश कारखान्याचे व्यवस्थापक



म्हणाले की मागील वर्षी प्रायोगिक तत्त्वावर २०० टन पोटॅशचे उत्पादन झाले. यंदा उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवून दोन ते तीन हजार मेट्रिक टन करण्याचे नियोजन आहे. परिसरातील शेतकऱ्यांना अल्प दरात पोटॅश उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

निपाणी टाकळीच्या सरपंच उषा भगवान राठोड म्हणाल्या की कारखाना प्रशासनाने ग्रामपंचायतची रीतसर परवानगी घेऊनच हा प्रकल्प या ठिकाणी उभारला आहे.कारखान्यामुळे या भागाचा विकास होत आहे शेतकऱ्यांचे हीत जोपासत कारखान्याने अल्पदरात शेतकऱ्यांना पोटॅश देत आहेत व कारखाना शेतकऱ्यांसाठी आणखी विविध योजना राबवत आहे हे शेतकऱ्यांसाठी चांगलेच आहे असे त्या म्हणाल्या.

शेतकरी बंडू जिजाभाऊ ढिसले म्हणाले, शेतीसाठी आवश्यक खत स्थानिक पातळीवर आणि कमी दरात मिळत असेल तर शेतकऱ्यांसाठी ही समाधानाची बाब आहे. कारखाना प्रशासनाने हा उपक्रम सातत्याने सुरू ठेवावा या ड्रायर व बॉयलरच्या जवळच मी राहतो यापासून आम्हाला कसल्याही प्रकारचा त्रास नाही उलट यापासून शेतकऱ्यांचा फायदाच आहे. शेतकरी नवनाथ पवार म्हणाले, मी देखील येथेच राहत असून यापासून आम्हाला कसल्याही प्रकारचा त्रास नाही तसेच पोटॅश अल्प दरात उपलब्ध झाल्यास ऊस उत्पादकांसह इतर पिकांच्या शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होईल. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होईल. दरम्यान, परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी जय महेश कारखान्यास मोठ्या प्रमाणात ऊस देऊन सहकार्य करावे, असे आवाहन कारखाना प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कमरेला गावठी कट्टा लावून फिरणाऱ्या ट्रक चालकाला एलसीबीने पकडले

### शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

शहरातील जालना रोडवर रिलायन्स मॉल परिसरात कमरेला बेकायदेशीर गावठी कट्टा (पिस्तूल) लावून फिरणाऱ्या एका ट्रक चालकाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रंगेहात पकडून बेड्या ठोकल्या. त्याच्याकडून एक गावठी कट्टा व चार जिवंत काडतुसे असा सुमारे ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, ३ सप्टेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी कार्यालयात हजर असताना, जालना रोडवरील रिलायन्स मॉलजवळ एक इसम कमरेला पिस्तूल लावून संशयितरीत्या फिरत असल्याची खात्रीशीर माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली. ही माहिती मिळताच पथकाने पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना अवगत केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने तात्काळ सापळा रचून संशयितास ताब्यात घेतले.

चौकशीअंती त्याचे नाव सत्यम अशोक कासार (वय २३ वर्षे, रा. अस्तीगाव, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) पान ३ वर

# बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा धनंजय मुंडेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

मुंबई । प्रतिनिधी

यावर्षी संपूर्ण पावसाळ्यात पावसाने तीव्र ताण दिला असून ऑगस्ट अखेर सरासरीच्या १०% सुद्धा पाऊस बीड जिल्ह्यात पडलेला नाही, परिणामी शेतकरी व सर्वसामान्य जनता संकटात सापडली असून बीड जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून त्यानुसार शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना सवलती देण्याची मागणी माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

यावर्षी अवर्षणामुळे खरिपातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, बाजरी यांसह सर्वच पिके ओलाव्याअभावी करपू लागली आहेत. यंदाचा खरीप हंगाम १००% हातातून जाईल अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे तलाव, विहिरी आदींमधील पाणी पातळी झपाट्याने खालावली असून तलाव कोरडे पडू लागले आहेत. त्यामुळे ऊसा सारख्या पिकांना पाणी मिळण्याचे तर दूरच राहिले पण पिण्याच्या पाण्याचे देखील तीव्र संकट उभे राहण्याची भीती निर्माण झाली असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले असून, या दुष्काळ चक्रामुळे बीड जिल्ह्यात विदारक परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त करत राज्य सरकारने तातडीने दखल घेण्याची मागणी धनंजय मुंडे यांनी केली आहे.

या गंभीर परिस्थितीचा विचार करून राज्य सरकारने महसूल व कृषी विभागाच्या वतीने सर्व महसूली मंडळांमध्ये तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना प्राथमिक आर्थिक मदत देण्याची विनंती केली असून, पर्जन्यमानाच्या आकडेवारी तपासून अधिकृतपणे कोरडा दुष्काळ जाहीर करून त्यानुसार मिळणाऱ्या शासकीय सवलती देण्याची मागणी केली आहे. भविष्यात पिण्याच्या पाण्याचा, जनावरांच्या चाऱ्याचा देखील प्रश्न गंभीर होणार असून या सर्वच गोष्टींचा विचार करून बीड जिल्ह्यात कृत्रिक पावसाचे प्रयोग करण्याचीही मागणी श्री मुंडे यांनी केली आहे.

# केज मतदारसंघात आगामी सर्व निवडणुकीत शिवसेना शेतकरी व कष्टकऱ्यांच्या मुलांना सत्तेत बसवणार – सचिन मुळूक

बीड । प्रतिनिधी

केज, अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघातील विविध गावांतील ग्रामपंचायत सदस्यांसह मान्यवरांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावरुन शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लोकप्रियता दिसून येते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत येणाऱ्यांची संख्या वाढत असून कार्यकर्त्यांच्या प्रवेशामुळे केज, अंबाजोगाई मतदारसंघात शिवसेनेला आणखी बळ मिळाले असून आगामी केज विधानसभा मतदारसंघात शेतकरी व कष्टकऱ्यांच्या मुलांना सत्तेत बसवणार असे प्रतिपादन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, खा. डॉ.श्रीकांत शिंदे साहेब ,सचिव संजय मोरे साहेब यांच्या आदेशानुसार व संपर्कप्रमुख मनोज शिंदे साहेब यांच्या सूचनेवरून शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या बीड येथील सह्याद्री निवाससस्थानी झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात या वेळी संदीप बन्सी आव्हाड (आंबेजोगाई), भारत दशरथ सोनवणे (डिगोळअंबा), ज्योती भरत सोनवणे, शेख दस्तगीर उर्फ राजू अमीनसाब (लाडेगाव), संदीप बालासाहेब आंबाड, प्रशांत पांडुरंग ठोंबरे (ग्रामपंचायत सदस्य, उंदरी), अनुपम अशोक ठोंबरे (ग्रामपंचायत सदस्य, उंदरी) आणि संदीप हनुमंत ठोंबरे (उंदरी) यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

जिल्हाप्रमुख मुळूक म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी काम करत आहे. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध क्षेत्रातील कार्यकर्ते शिवसेनेशी जोडले जात आहेत. केज, अंबाजोगाई मतदारसंघातही पक्षाचे संघटन मजबूत पान ३ वर

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची संवेदनशीलता

## मुलींच्या शिक्षणासाठी अनवाणी पायाने धावणाऱ्या रमाबाईंचा जिल्हा प्रशासनाकडून सन्मान

बीड । प्रतिनिधी

रमाताईंच्या विजयामागे केवळ स्पर्धा जिंकण्याची इच्छा नव्हती तर मुलींच्या शिक्षणासाठी संघर्ष करण्याची आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी आर्थिक मदत मिळविण्याची प्रबळ प्रेरणा होती. त्यामुळे त्यांचा हा विजय केवळ एका मॅरेथॉन स्पर्धेतील विजय न राहता आईच्या ममतेचा, त्यागाचा, संघर्षाचा आणि मातृत्वाच्या जिद्दीचा विजय ठरला आहे. त्यांच्या या प्रेरणादायी यशाची दखल जिल्हा प्रशासनानेही घेतली आहे. आपल्या मुलींच्या भविष्यासाठी एक आई किती कष्ट सोसू शकते, याचे रमाताई या मूर्तिमंत उदाहरण आहेत. असे भावनिक आणि गौरवास्पद उद्गार जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी काढले.



जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी दिव्यांक गुप्ता, अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरांगे, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी मनोज घोडे पाटील, उपविभागीय अधिकारी दिपक वजाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महसूल अधिकारी व जिल्हा प्रशासनाच्यावतीने रमाबाई रणवीर यांचा यथोचित सन्मान करत ५० हजार रुपयांची रोख रक्कमेतून मदतीचा हात देण्यात आला. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या पुढाकारातून मदत निधी संकलित करण्यात आला.

रमाताईंच्या दोन्ही मुलींच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत भविष्यात शिक्षणासाठी काही अडचण आल्यास आपण त्यांच्या पाठीशी नेहमी खंबीरपणे उभे असल्याची नि:संदिग्ध ग्वाही जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली. पान ३ वर

# गणेशोत्सव अवघ्या दहा दिवसांवर येवून ठेपला गणेशमूर्तींच्या रंगरंगोटीचे काम अंतिम टप्प्यात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या आणि उत्साहात साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला अवघे दहा दिवस शिल्लक राहिल्याने युसूफवडगाव परिसरातील गणेशमूर्तिकारांची लगबग वाढली आहे. गणेशमूर्तींच्या निर्मितीचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सध्या मूर्तींना आकर्षक रंग देणे, रंगरंगोटी, नक्षीकाम व सजावटीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.



### यंदाच्या गणेशोत्सवाला महागाईची झळ; बाप्पाच्या मूर्तींचे दर वाढणार, भक्तांच्या खिशाला कात्री

गणेशोत्सव जवळ येताच बाप्पाच्या आगमनासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरगुती गणपतींसह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मूर्तींनाही मागणी वाढू लागली आहे. त्यामुळे मूर्तिकारांकडून दिवस-रात्र मेहनत घेऊन मूर्तींना अंतिम रूप दिले जात आहे.

मात्र, यंदाच्या गणेशोत्सवावर महागाईचे सावट दिसून येत आहे. गणेशमूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किमतीत वाढ झाल्याने मूर्तिकारांचा उत्पादन खर्च वाढला आहे. त्यात रंग, सजावटीचे साहित्य, मजुरी तसेच पान ३ वर

# गंगामसला येथे मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठिंबा शिवराज सोळंके यांचे पाण्याच्या टाकीवर आमरण उपोषण



## मराठा समाजाच्या मागण्या तातडीने मान्य करून जरांगे पाटील यांचे उपोषण सोडवावे; शासनाकडे युवकाची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी गंगामसला येथील युवक शिवराज सोळंके यांनी गावातील पाण्याच्या टाकीवर बसून दि ०४ सप्टेंबर शुक्रवार रोजी पासुन आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांच्या उपोषणाचा दि ०४ सप्टेंबर शुक्रवार रोजी पहिला दिवस असून, मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा दि ०४ सप्टेंबर शुक्रवार रोजी सातवा दिवस आहे. दरम्यान,दि ०३ सप्टेंबर गुरुवार रोजी रात्री शासनाचे शिष्टमंडळाने अंतरवली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.मात्र, त्यांच्या मागण्यांबाबत अद्याप ठोस निर्णय झालेला नसल्याने आंदोलनाची तीव्रता कायम आहे.संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या शासनाने लवकरात लवकर मान्य कराव्यात, त्यांचे आमरण उपोषण सोडवण्यासाठी सकारात्मक निर्णय घ्यावा आणि मराठा समाजाला न्याय द्यावा,या मागणीसाठी शिवराज सोळंके यांनी गंगामसला येथील पाण्याच्या टाकीवर आमरण उपोषण सुरू केले आहे.मराठा पान ३ वर

# ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देणारे प्रा. मल्लिकार्जुन गडकर

## १७ वर्षे विनाअनुदानित शिक्षणसेवा; भारतीय सेना, मेडिकल, इंजिनिअरिंगसह विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांची भरारी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला योग्य दिशा मिळाली, तर तेही कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करू शकतात, हे आपल्या कार्यातून सिद्ध करणारे शिक्षक म्हणून प्रा. मल्लिकार्जुन गडकर यांची ओळख आहे. सध्या युसूफवडगांव येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले गडकर सर यांनी शिक्षण, मार्गदर्शन आणि विद्यार्थी घडविण्याच्या कार्यात सातत्यपूर्ण योगदान दिले आहे.

गडकर सरांनी शिकवणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासाचे मार्गदर्शन केले नाही, तर त्यांच्या क्षमतेला योग्य दिशा देत भविष्यातील संधींची जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांसोबतच त्यांच्या पालकांच्या अपेक्षा आणि स्वप्नांनाही त्यांनी आपल्या कार्यातून बळ दिले. विद्यार्थ्यांचे यश हेच शिक्षकाच्या कार्याचे खरे फलित, या भावनेतून त्यांनी ज्ञानदानाचे कार्य सुरू ठेवले.



१७ वर्षांची विनाअनुदानित शिक्षणसेवा

भालचंद्र शिक्षण संस्थेत त्यांनी तब्बल १७ वर्षे कायम विनाअनुदानित शाळेत कार्य केले. आर्थिक व वैयक्तिक अडचणींचा सामना करत असतानाही त्यांनी शिक्षण क्षेत्रातील आपली निष्ठा कायम ठेवली. कुटुंबाच्या जबाबदाऱ्या सांभाळत ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी सातत्याने सुरू ठेवले.

त्यांच्या मार्गदर्शनातून घडलेले विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. विशेषत: पंचक्रोशीतील शेकडो विद्यार्थी भारतीय सेनेत जीडी, क्लारिकल, नर्सिंग आणि टेक्निकल विभागांत कार्यरत आहेत. तसेच नीट, सीईटीच्या माध्यमातून मेडिकल, इंजिनिअरिंग, फार्मास्युटिकल्स, नर्सिंग आणि बी.एस्सी. ॲग्रीकल्चर यांसह विविध क्षेत्रांतही त्यांच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले आहे.

विद्यार्थ्यांचे यश हीच कार्याची पावती

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि उपलब्ध संधींचा योग्य उपयोग करून देणे, हे गडकर सरांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून विविध क्षेत्रांत पोहोचलेले विद्यार्थी ही त्यांच्या शैक्षणिक कार्याची जणू पावतीच आहे.

शिक्षक म्हणून केवळ वर्गातील अध्यापनापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार करणाऱ्या गडकर सरांनी अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा दिली आहे. पान ३ वर

# कुप्पा–परडी माटेगाव रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तालुका उपाध्यक्ष महादेव गणपतराव सावंत यांचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कुप्पा ते परडी माटेगाव या महत्त्वाच्या रस्त्याचे काम अत्यंत संथगतीने सुरू असून, यामुळे वाहनधारकांसह नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे संबंधित ठेकेदार व एजन्सीला तातडीने सूचना देऊन रस्त्याचे काम पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) वडवणी तालुका उपाध्यक्ष महादेव गणपतराव सावंत यांनी केली आहे.

याबाबत त्यांनी सा. बां. उपविभाग वडवणीचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, वडवणी तालुक्यातील जनतेच्या दळणवळणासाठी महत्त्वाचा असलेला राष्ट्रीय महामार्ग बीड–परळी रोड ते कुप्पा फाटा ते परडी माटेगाव रोड या मार्गाचे काम सुरू आहे. मात्र सदर काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या



वाहनधारकांची तसेच नागरिकांची गैरसोय होत आहे.

रस्त्याचे काम वेळेत पूर्ण न झाल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून, पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26